
## राज्यात आता १ एप्रिलपासून ई-ऑफिस प्रणाली



**मुंबई** : प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान होण्यासाठी येत्या १ एप्रिल २०२३पासून राज्यभरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणाली सुरू करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. १) जाहीर केले आहे. केंद्राच्या धर्तीवर राज्यातदेखील शासकीय कामकाजाच्या फाईल्स निर्णयासाठी चार स्तरापर्यंतच पाठविण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणालीचा वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येईल, शिवाय कामकाज संपूर्णपणे पेपरलेस होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे. त्यामुळे येत्या १ एप्रिलपासून राज्याच्या सर्व कार्यालयांमध्ये 'ई-ऑफिस' प्रणाली सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.


शुक्रवार, २ डिसेंबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक १३५

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


### अंतरंग


नवीन पनवेलला जोडणाऱ्या रेल्वेपुलाच्या दुरुस्तीची मागणी/३

'नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांना कायम नोकरीत समाविष्ट करा'/६

'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची वूशु स्पर्धेत दमदार कामगिरी/८


# राज्यातील १७ लोकसभा मतदारसंघ करणार बळकट

## केंद्रीय मंत्री करणार प्रवास – चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्र्यांच्या मार्गदर्शनात राज्यातील १७ लोकसभा मतदारसंघातील संघटना बांधणीसाठी भाजप महाराष्ट्रतर्फे लोकसभा प्रवास योजना सुरू होत आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी (दि. १) मुंबईत दिली.

भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, नवनियुक्त प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, भाजप नेते आमदार श्रीकांत भारतीय, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये आणि प्रवक्ते गणेश हाके उपस्थित होते.



चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, केंद्रीय कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली लोकसभा प्रवास योजना राज्यात चालू आहे. त्यासाठी केंद्रीय मंत्री प्रवास करीत आहेत. त्याच पद्धतीने राज्यातील अन्य १७ लोकसभा मतदारसंघात राज्यातील केंद्रीयमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना अधिक बळकट करण्याचे काम होईल. ते म्हणाले की, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी हे अकोला, अमरावती, वर्धा, रामटेक, भंडारा, गडचिरोली आणि यवतमाळ लोकसभा मतदारसंघांचे प्रभारी असतील. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्याकडे ठाणे आणि उत्तर पश्चिम मुंबई या मतदारसंघांची जबाबदारी असेल. नारायण राणे (सांगली), रावसाहेब दानवे (लातूर व मावळ), डॉ. भागवत कराड (परभणी व धुळे), डॉ. भारती पवार (नाशिक) आणि कपिल पाटील (रावेर आणि सोलापूर) या केंद्रीयमंत्र्यांच्या मार्गदर्शनात इतर लोकसभा मतदारसंघात संघटनात्मक बळकटीचे काम होईल. केंद्रीयमंत्री महिन्यातून एकदा संबंधित लोकसभा मतदारसंघात एक दिवसाचा प्रवास करतील व त्यामध्ये संघटनात्मक आणि सार्वजनिक स्वरुपाचे कार्यक्रम असतील. ही योजना सुरू झाली आहे.

त्यांनी सांगितले की, राज्याच्या लोकसभा प्रवास योजनेचे मुख्य संयोजक किशोर काळकर आहेत, केंद्रीय लोकसभा प्रवास योजनेचे प्रभारी माजी मंत्री बाळा भेगडे आहेत. ते म्हणाले की, राज्यातील विधानसभा मतदारसंघांमध्ये संघटनात्मक बळकटीसाठी एक स्वतंत्र योजना लवकरच सुरू होणार आहे. त्याची जबाबदारी आमदार श्रीकांत भारतीय यांच्यावर देण्यात आली आहे.

भाजपचे नंदूरबार जिल्हाध्यक्ष विजय चौधरी यांची पक्षाचे प्रदेश सरचिटणीस म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे, अशी घोषणाही त्यांनी केली. त्यांनी सांगितले की, राज्यातील ७,७५१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. राज्य निवडणूक आयोगाने ऑनलाईन पद्धतीने नामांकनाची पद्धती लागू केली होती, पण गेल्या चार दिवसांपासून सर्व्हर डाऊन झाल्यामुळे ५० टक्केच अर्ज दाखल झाले. त्यामुळे ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरण्यास परवानगी द्यावी व अर्ज भरण्याची मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी आपण राज्य निवडणूक आयोगाला केली होती. आयोगाने ऑफलाईन अर्ज भरण्याची परवानगी दिली असून अर्ज दाखल करण्याची मुदत साडेतीन तास वाढविली आहे. आपण राज्य निवडणूक आयोगाचा आभारी आहोत.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात गेल्या अडीच वर्षांत महाराष्ट्र कोणकोणत्या विभागात मागे पडला, यावर श्वेतपत्रिका काढावी, अशी आपली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारकडे मागणी आहे. प्रत्येक विभागाचा अहवाल मांडला तर महाविकास आघाडीच्या नेत्यांना पळताभुई थोडी होईल, असे ते म्हणाले.

### अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा

# आजपासून महाअंतिम फेरी; मान्यवरांची लाभणार उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नवव्या मानाच्या अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला शुक्रवारी (दि. २)पासून पनवेलमध्ये प्रारंभ होणार आहे. पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणाऱ्या या महाअंतिम फेरीचे उद्घाटन शुक्रवारी तर पारितोषिक वितरण रविवारी (दि. ४) होणार आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यात ज्येष्ठ कलावंत, रंगकर्मी जयंत सावरकर यांचा 'गौरव रंगभूमीचा' या पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.



या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजप सांस्कृतिक सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख यांची तर प्रसिद्ध लेखक, निर्माते व दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे, अभिनेते, लेखक व दिग्दर्शक अभिराम भडकमकर, अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक विजय गोखले, सुप्रसिद्ध अभिनेता भरत सावले, सुप्रसिद्ध उद्योजक विलास कोठारी, सुप्रसिद्ध विनोदी अभिनेता पृथ्वीक प्रताप यांची उपस्थिती असणार आहे.

'रंगमंच आमचा, कलाविष्कार तुमचा' हे ब्रीदवाक्य घेऊन गेली १५ वर्षे पनवेलमध्ये एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. आधी सात वर्षे ही स्पर्धा 'मल्हार करंडक' या नावाने जिल्हास्तरीय स्वरूपात आयोजित केली जात होती. आता गेली आठ वर्षे ही स्पर्धा अटल करंडक या नावाने राज्यस्तरीय स्वरूपात आयोजित केली जात आहे.

यंदाचे या स्पर्धेचे नववे वर्ष आहे. नाट्यचळवळ वृद्धिंगत व्हावी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धिंगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्यपरिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी अटल करंडक एकांकीका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली. दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. या स्पर्धेचे प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. तर सहप्रायोजक नील ग्रुप आहे. **(पान २ वर...)**

# महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाची केंद्राकडून गंभीर दखल

## पंतप्रधान व गृहमंत्री दोन्ही मुख्यमंत्र्यांसोबत घेणार बैठक

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाबाबत सुनावणी सुरू आहे.दरम्यान या प्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांची लवकरच बैठक होणार आहे. याबद्दलची माहिती सीमावाद तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष खासदार धैर्यशील माने यांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लवकरच बैठक होणार आहे. त्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे माने यांनी सांगितले. दरम्यान हरीश साळवे हे या प्रकरणात वकील म्हणून काम करतील, तसेच त्यांच्यासोबत अधिक वकील जोडून देत आहोत, अशी माहितीदेखील खासदार माने यांनी दिली आहे.

महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यातील सीमाप्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहे. १७ जानेवारी १९५६मध्ये रोजी बेळगाव, कारवार, बिदरसारखी मराठी गावे तत्कालीन म्हैसूर राज्यात समाविष्ट करण्यात आली होती. बेळगाव जिल्ह्यात मराठी



भाषिकांचे प्राबल्य असतानाही महाराष्ट्रापासून तोडल्यामुळे इथल्या जनतेच्या भावना तीव्र आहेत. गेल्या ५० वर्षांपासून बेळगावची जनता महाराष्ट्रात सामिल होण्यासाठी संघर्ष करीत आहे. सीमाभागातील मराठी भाषिकांवर त्यावेळी झालेला अन्याय दूर करण्यासाठी लढा सुरू केला होता, तो अद्यापही कायम आहे.

मागच्या काही दिवसांपासून कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्यात सीमेवरून वाद सुरू आहे, तसेच या प्रकरणी दोन्ही राज्यांकडून आपापली बाजू मांडली जात आहे. यादरम्यान भाजप नेते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्याची इंचभर जमीनदेखील कर्नाटकला देणार नाही, अशी भूमिका जाहीर केली आहे. मागच्या सरकारपेक्षा सध्याचे सरकार बळकट असल्याचेदेखील बावनकुळे म्हणाले आहेत.

## समान नागरी कायद्याबाबत योग्य वेळी निर्णय-उपमुख्यमंत्री



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात समान नागरी कायदा लागू करण्याचा निर्णय योग्य वेळी घेतला जाईल. देशाच्या राज्यघटनेने ही जबाबदारी राज्यांना दिली असून प्रत्येक राज्याला कधी ना कधी हा निर्णय घ्यावाच लागेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. ३०) गुजरातमधील अहमदाबाद येथे केले.


गुजरात निवडणूक प्रचार दौऱ्यावर असलेल्या फडणवीस यांनी अहमदाबाद येथे बोलत होते. फडणवीस म्हणाले, देशाच्या राज्यघटनेने समान नागरी कायद्याबाबत राज्यांना जबाबदारी दिली आहे, पण काही कारणांमुळे देशात तो लागू होऊ शकलेला नाही. समान नागरी कायदा गोव्यात अंमलात आला असून उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि गुजरातमध्ये तो अंमलात आणण्यात येणार आहे. प्रत्येक राज्याला याबाबत निर्णय घ्यावा लागणारच आहे, पण मी याची घोषणा करणार नाही, तो अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे, असेही त्यांनी या वेळी नमूद केले.

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी ऑफलाईन अर्ज सादर करण्याची मुभा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

विविध जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींच्या सदस्यपदांसह थेट सरपंचपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ऑफलाईन नामनिर्देशनपत्र सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे, तसेच नामनिर्देशनपत्र सादर करण्याची मुदत शुक्रवारी (दि. २) सायंकाळी ५.३०पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी दिली आहे.

मदान यांनी सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाने ९ नोव्हेंबर रोजी राज्यातील सात हजार ७५१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा केली होती. त्यानुसार





२८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर (दुपारी ३ वाजेपर्यंत) या कालावधीत संगणक प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यात आता अंशतः दुरूस्ती करून नामनिर्देशनपत्र ऑफलाईन पद्धतीने शुक्रवारी सायंकाळी ५.३०पर्यंत सादर करता येतील. संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन रायगड जिल्हा प्रशासनातर्फे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील यांनी केले आहे.





**खारघर : पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यात येत आहेत. त्या अंतर्गत खारघर सेक्टर ४ आणि हिरानंदानी परिसरात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांची पाहणी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींसह करून आवश्यक सूचना दिल्या. या वेळी स्थायी समितीचे माजी सभापती नरेश ठाकूर, माजी नगरसेवक हरेश केणी, भाजपचे खारघर शहर सरचिटणीस किर्ती नवघरे, अमर उपाध्याय, महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर आदी उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दूल)




# उमेद अभियानातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट



## ■ ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचे प्रतिपादन
## ■ राज्यातील ३८ हजार गावांमध्ये प्रभावी अंमलबजावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

उमेद अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरणाबरोबरच ग्रामीण भागातील अर्थ व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी प्रभावी ठरत असल्याचे मत ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केले. ते बुधवारी (दि. ३०) माटुंगा येथील षण्मुखानंद सभागृहात उमेद महिला सक्षमीकरण विशेष कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमात बोलत होते.

ग्रामविकासामध्ये महिलांचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा असून समृद्ध महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी गरिब, विधवा, निराधारांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबध्द असल्याचे मत या वेळी महाजन यांनी व्यक्त केले.

राज्यातील महिला बचतगटाच्या सक्षमीकरणासाठी उत्पादित केलेल्या मालाची विक्री व्यवस्थापन पॅकिंग तसेच मार्केटिंग करण्यावर भर देण्यात यावा. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शहरालगत मोठ्या मॉलची उभारुणी करून महिला बचत गटाच्या वतीने उत्पादित मालाची विक्री करण्यासाठी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे ही या वेळी महाजन म्हणाले. राज्यातील जवळपास ३८ हजार गावांमधील ५५ लाख कुटुंबे या अभियानात सहभागी झाले आहेत. माध्यमातून पाच लक्ष ८४ हजार स्वयंसहाय्यता गटांची निर्मिती झाली असून १० हजार उत्पादन गट तयार करण्यात आले असून ४५ शेतकरी उत्पादक गट तयार करण्यात आले असून जवळपास १७ हजार कोटी रुपयांचे कर्ज बँकांच्या माध्यमातून तसेच अभियानांतर्गत ११ कोटी रुपयांच्या निधीचे वाटप स्वयंसहाय्यता गटांना करण्यात आले असून येणाऱ्या काळात यामध्ये भरीव आर्थिक तरतूद करण्यात येईल असे आश्वासन ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी दिले. अत्यंत देखण्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल सल्लागार राजेश कुलकर्णी आणि उमेद टीमचे कौतुक केले.

ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांनी, राज्याच्या ग्रामीण आर्थिक विकासात उमेद अभियान महत्वाची भूमिका निभावत असून अभियानातील सहभागी कुटुंबाचे किमान एक लाख वार्षिक उत्पन्न करण्यासाठी विभाग प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

# मुख्यमंत्र्यांची वैद्यकीय सहाय्यता निधी कार्यालयास भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

वैद्यकीय उपचारासाठी गरजू रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून देण्यात येणारी आर्थिक मदत तातडीने उपलब्ध होण्यासाठी मंजुरीची प्रक्रिया जलदगतीने करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. १) येथे दिले.

मंत्रालयात असलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचया कार्यालयास मुख्यमंत्र्यांनी अचानक भेट दिली. या वेळी त्यांनी कार्यालयात आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांशी संवाद साधत त्यांना दिलासा दिला. या वेळी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव विकास खारगे उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे यांनी या ठिकाणी मुख्यमंत्री डॅशबोर्डसाठी असलेल्या कार्यालयाची पाहणी केली. अधिकारी, कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. आर्थिक मदतीच्या प्रकरणांना किती दिवसात मंजुरी मिळते, मंजुरीचा कालावधी आदीबाबत त्यांनी माहिती घेतली. राज्याच्या कानाकोपऱ्यातील गरजू रुग्णांपर्यंत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची मदत पोहचवण्यासाठी प्रयत्न करा, रुग्णांच्या नातेवाईकांच्या समस्या सोडविण्याकरिता त्याच्या समन्वयासाठी विशेष कर्मचाऱ्याची नेमणूक करा, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीच्या माध्यमातून अवघ्या चार महिन्यात एक हजार ६२ रुग्णांना सहा कोटी ४० लाखांची मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचा एक भाग म्हणून mahacmmrf.com हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या निकषात यापूर्वी समावेश नसलेल्या फुफ्फुसाची शस्त्रक्रिया, गुडघे बदल, खुबा बदल शस्त्रक्रिया यांचा समावेश आहे, तसेच अपघातामधील रुग्णांनाही या योजनेतून आर्थिक मदत दिली जाणार आहे.

# गव्हाण विद्यालयात शालेय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देशाचे माजी कृषी मंत्री खासदार शरद पवार यांच्या ८२व्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्या रायगड विभागाच्या वतीने 'कृतज्ञता सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये वक्तृत्व स्पर्धा गुरुवारी (दि. १) उत्साहात झाली.

या स्पर्धेचे उद्घाटन विद्यालयाचे उपमुख्याध्यापक तथा प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले यांनी केले. या वेळी 'रयत'चे लाईफ मेबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, कार्यालयीन लेखनिक चंद्रकांत मढवी तसेच सर्व गटनिहाय स्पर्धाप्रमुख अस्मिता पाटील-वर्तक, हर्षला पाटील, संपदा म्हात्रे, प्रसन्न ठाकूर, एकनाथ ठाकूर, प्रा. राजेंद्र चौधरी, प्रा. उमेश पाटील, प्रा. जयवंती ठाकूर, सुजाता चौधरी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी प्रमोद मंडले व प्रमोद कोळी यांनी आपले विचार व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेची सुरुवात स्मित मोकल याच्या भाषणाने झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक आणि स्पर्धाप्रमुख सागर रंधवे यांनी केले. मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषेतून या स्पर्धा झाली. या स्पर्धेतील विजेत्यांची पुढील फेरी गटपातळीवरील फेरीमध्ये त्यांची निवड झाली आहे. त्या फेरीतून विजयी ठरणाऱ्या उमेदवारांची अंतिम फेरीसाठी गव्हाण शाखेमध्ये निवड होईल.

अंतिम फेरीतील विजेत्यांना प्रथम क्रमांक तीन हजार रू., द्वितीय दोन हजार रू., तृतीय क्रमांक एक हजार रू. अशी भाषानिहाय आणि मराठी व इंग्रजी स्वतंत्र माध्यम निहाय पारितोषिक ठेवण्यात आली आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची गटनिहाय फेरी जासई शाखेमध्ये होईल आणि अंतिम फेरी पुन्हा गव्हाण शाखेमध्येच ७ डिसेंबर रोजी होणार आहे.

# 'इझ ऑफ लिव्हिंग सर्वेक्षणात विद्यार्थ्यांनी योगदान द्यावे'



**पनवेल : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण कल्पना वापरून कचऱ्याचे वर्गीकरण करावे, याविषयीचे छोटे उपक्रम राबवून आपले योगदान विद्यार्थ्यांनी द्यावे, असे आवाहन युनिसेफचे राज्य सल्लागार तानाजी पाटील यांनी केले. ते पनवेल महापालिका, पिल्लई कॉलेज आणि इन्फिनीटी फाउंडेशन यांच्या संयुक्त कार्यक्रमात केले.

पनवेल महानगरपालिका, पिल्लई कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स, सायन्स आणि इन्फिनिटी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पिल्लई कॉलेज नवीन पनवेल येथे गुरुवारी (दि. १) झालेल्या कार्यक्रमामध्ये स्वच्छ सर्वेक्षण ईज ऑफ लिव्हिंग २०२२, नेहरू युवा केंद्राची माहिती देण्यात आली.

या वेळी पनवेल महापालिकेचे सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, युनिसेफचे राज्य सल्लागार तानाजी पाटील, नेहरू युवा केंद्र आणि युवा मंत्रालयाचे राज्याचे संचालक प्रकाश मानुरे, महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन वडेर, उपप्राचार्य दिपिका शर्मा, इन्फिनिटी फाऊंडेशनचे आयुफ आकुला, महापालिका जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, समन्वय आरती सुखेजा, प्रा. किरण देशमुख, पिल्लई कॉलेजचे प्राध्यापक, विद्यार्थी, महापालिका कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी स्वत:मध्ये बदल घडवला तरच ते चांगल्या आरोग्याबरोबरच सामाजिक जबाबदारीचे भान असलेले चांगले नागरिक बनू शकतात असे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.

सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते यांनी प्रत्येकाने स्वत:पासून सुरूवात केली तर शहर स्वच्छ होण्यास वेळ लागणार नाही, असे सांगून केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षणाविषयी माहिती सांगितली. नेहरू युवा केंद्र आणि युवा मंत्रालयाचे राज्याचे संचालक प्रकाश मानुरे यांनी विद्यार्थ्यांना नेहरू केंद्र राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती सांगितली.

# पनवेल महापालिका हद्द दर्शविणारे फलक बसवा

### भाजपच्या दीपक शिंदे यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका आपले सहर्ष स्वागत करीत आहे या आशयाचे फलक पालिका हद्द सुरू होते, अशा ठिकाणच्या महामार्गांवर लावण्यासाठी भाजप खारघर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

पनवेल महापालिका अस्तित्वात येऊन सहा वर्षे उलटून गेली तरी पालिका हद्दीतून जाणाऱ्या महामार्गांवर स्वागत व धन्यवादाचे फलक लावले गेलेले नाही. नवी मुंबई पालिकेला लागून असलेल्या खारघर शहराच्या बेलपाडा गावावरून पालिकेची हद्द सुरू होते व पनवेल येथील ओएनजीसी सिग्नलला हद्द संपते. शिवाय ठाणे महापालिकेला लागून असलेल्या मुंब्रा-पनवेल महामार्गांवरील धानसर गावाजवळ हद्द संपते. या तिन्ही ठिकाणी स्वागत व धन्यवादचे फलक लावण्यासाठी खारघर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे यांनी आयुक्त गणेश देशमुख यांना ई-मेल करून निवेदन दिलेले आहे. याशिवाय आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनासुद्धा निवेदन देण्यात आले आहे.

# दोषमुक्तीचा अर्ज करण्यासाठी केंद्रीयमंत्री नारायण राणे अलिबाग न्यायालयात



**अलिबाग : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याप्रकरणी सुरू असलेल्या खटल्यात दोषमुक्त करावे असा अर्ज करण्यासाठी केंद्रीय मंत्री नारायण राणे गुरुवारी (दि. १) अलिबाग न्यायालयात हजर झाले.

नारायण राणे केंद्रीयमंत्री झाल्यानंतर त्यांनी कोकणात जनआशीर्वाद यात्रा काढली होती. या यात्रेदरम्यान २३ ऑगस्ट रोजी महाड येथील पत्रकार परिषदेत त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याबाबत २४ ऑगस्ट रोजी राणे यांच्याविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर राणे यांना अटक करून महाड येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले. तेथे त्यांना सशर्त जामीन मंजूर करण्यात आला. यानंतर हा खटला अलिबागच्या प्रथमवर्ग न्यायालयाकडे वर्ग करण्यात आला आहे. त्याची सुनावणी गुरुवारी होती. त्यासाठी केंद्रीय मंत्री नारायण राणे अलिबाग येथील मुख्य न्यायदंडाधिकारी उगले यांच्या न्यायालयासमोर हजर झाले.

या गुन्ह्यात दोषारोप ठेवण्याइतपत सबळ पुरावे नसल्याने दोषमुक्त करावे यासाठी अर्ज देण्यात आला. त्याचबरोबर पुढील सर्व सुनावणीला गैरहजर राहण्यास मुभा मिळावी असाही अर्ज देण्यात आला. यावरील सुनावणी ५ जानेवारी २०२३ रोजी होणार आहे. नारायण राणे यांच्या वतीने ॲड . सतीश मानशिंदे, ॲड. संग्राम देसाई, ॲड. संदेश चिकणे, ॲड. अंकित बंगेरा यानी काम पाहिले.

# मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावर पोलीस ऑनड्युटी २४ तास

**पुणे : प्रतिनिधी**



मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावर गुरुवार (दि. १) पासून रस्ता सुरक्षा अभियान राबवले जात आहे. आरटीओ अधिकारी, कर्मचारी आणि महामार्ग पोलिसांची १२ पथके जुना आणि यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर कार्यरत असणार आहेत. द्रुतगती मार्गावरील अपघात रोखण्यासाठी आणि वाहनचालकांना शिस्त लागावी म्हणून हा उपक्रम राबवला जात असल्याची माहिती उपपरिवहन आयुक्त (रस्ता सुरक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबईचे भरत कळसकर यांनी दिली आहे. ते मावळमध्ये बोलत होते. हा उपक्रम पुढील सहा महिने सुरू राहणार असून यातून अनेक चालक सुधारतील अशी अपेक्षादेखील त्यांनी व्यक्त केली आहे.

भरत कळसकर म्हणाले की, आजपासून मोटार वाहन विभाग आणि महामार्ग पोलिसांकडून रस्ता सुरक्षा उपक्रम राबवला जात आहे. आरटीओ आणि महामार्गचे एकूण ३० अधिकारी जुना महामार्ग आणि पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर कार्यरत राहणार आहेत. दोन्ही रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी हा उपक्रम राबवला जात आहे. पहिले सात दिवस जनजागृती करणार आहोत. मग पुढे कारवाई केली जाणार आहे. लेन कटिंग, ओव्हर स्पीड, सीट बेल्ट यासह इतर नियम न पाळणाऱ्या वाहनचलकांवर १२ पथक २४ तास करडी नजर ठेवून असणार आहेत, असेदेखील त्यांनी सांगितले.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर अवैधरित्या पार्किंग, वाहतुकीस अडथळा, ओव्हरस्पीड, उजव्या मार्गिकेतून ट्रक, बस कंटेनर आदी कमी वेगात चालणाऱ्या वाहनांवर कारवाई, विनासीटबेल्ट प्रवास करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली जाणार आहे.

# नेरे येथून एक जण बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील नेरे वाजेपूर फार्म हाऊस येथून एक जण बेपत्ता झाल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. नेरे वाजेपूर फार्म हाऊस येथून संजय हरिभाऊ खरे (वय



६२) हे बहिणीकडे जाऊन येतो, असे सांगून गेले असून ते अद्याप परत न आल्याने त्यांची हरविल्याची तक्रार त्यांचे भाऊ संजय खरे यांनी तालुका पोलीस ठाण्यात दिली. संजय खरे यांची उंची पाच फूट दोन इंच, चेहरा उभट, नाक लांब व सरळ, केस काळे, गळ्यात मगण्यांची माळ, उजवी मांडी भाजलेली जूनी खूण, अंगात बर्मुडा व निळा टिशर्ट आहे. सोबत मोबाईल (९३२४६१५४५८) आहे. या व्यक्तीबाबत कोणास माहिती असल्यास त्यांनी तालुका पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक बी. एन. सांगळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून

# आजपासून महाअंतिम फेरी; मान्यवरांची लाभणार उपस्थिती

स्पर्धेमध्ये एकूण दोन लाख ७५ हजार रुपये रक्कम स्वरूपात पारितोषिके असून पनवेलमधील लोकप्रिय नाट्यकलावंत व वेशभूषाकार कै. किशोर जोशी यांच्या स्मरणार्थ सर्वोत्कृष्ट वेशभूषा हा विशेष पारितोषिक देण्यात येणार आहे. गेली आठ वर्षे सुरू असलेल्या या स्पर्धेने टप्प्याटप्प्याने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला आहे. कोरोना काळातही एवढ्या मोठ्या स्तरावर अटल करंडक ही एकमेव स्पर्धा होती जी संपूर्ण महाराष्ट्रात यशस्वीरित्या झाली. स्पर्धेच्या आठव्या वर्षी कोरोनाचे सर्व निर्बंध पाळत प्राथमिक फेरीसाठी जवळपास १०८ संघांनी सहभाग नोंदविला होता. या वर्षीदेखील अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेला प्राथमिक फेरीसाठी ११५ हून अधिक संघांनी सहभाग घेतला आहे. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला ४ नोव्हेंबरपासून विभागनिहाय प्रारंभ झाला. प्राथमिक फेरीसाठी परीक्षक म्हणून राहुल वैद्य (लेखक आणि अभिनेता) आणि दीपक पवार (दिग्दर्शक, लेखक आणि अभिनेता) यांनी ही कामगिरी यशस्वीरित्या पार पाडत महाअंतिम फेरीसाठी सर्वोत्कृष्ट अशा २५ एकांकिकांची निवड केली आहे. मराठी रंगभूमीला गेली अनेक वर्षे अनेक चांगले कलाकार अभिनेते, दिग्दर्शक लाभले. त्यांनी त्या काळात त्यांच्या मेहनतीवर मराठी रंगभूमी यशस्वीरित्या उभी केली, तिचा वारसा पुढे वाढवला. अशाच काही कलाकारांचा गुणगौरव हा अटल करंडकचा रंगमंचावर करण्यात यावा, यासाठी मागील वर्षीपासून अशाच एका कलाकाराला 'गौरव रंगभूमीचा' या पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ व रुपये ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप असणार आहे. एकांकिका स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच कोणत्यातरी एकांकिका स्पर्धेला ब्रॅण्ड ॲम्बेसिडर अशी एक नावीन्यपूर्ण संकल्पना सुरू करण्यात आली आहे. अटल करंडकमधून जो कलाकार विजेता आहे आणि आज तो यशस्वीरित्या या क्षेत्रात कार्यरत आहे, अशा एका कलाकाराला ब्रँड ॲम्बेसिडरचा मान देण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार सुप्रसिद्ध अभिनेता ओंकार भोजने याची निवड ब्रँड ॲम्बेसिडर म्हणून अटल करंडकच्या मागील वर्षासाठी करण्यात आली होती. त्याचप्रमाणे या वर्षी सुप्रसिद्ध अभिनेता, महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम, निरागस विनोदीवीर पृथ्वीक प्रताप यांची ब्रॅण्ड ॲम्बेसिडर म्हणून निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेत प्रथम पारितोषिक एक लाख रुपये, द्वितीय ५० हजार रुपये, तृतीय २५ हजार रुपये, चतुर्थ १० हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक पाच हजार रुपये, दोन उत्तेजनार्थ पारितोषिके अशाप्रकारे भरघोस रकमेची सांघिक पारितोषिके या स्पर्धेसाठी देण्यात येतात. वैयक्तिक पारितोषिकांमध्ये उत्कृष्ट अभिनेता, उत्कृष्ट अभिनेत्री, नेपथ्य, संगीत, लाईट, लेखक आणि दिग्दर्शक या स्वरूपात अनुक्रमे प्रथम पारितोषिक दोन हजार रु., द्वितीय १५०० रु., तृतीय एक हजार रु., उत्तेजनार्थ ५०० रु. अशा स्वरूपाची वैयक्तिक पारितोषिके दिली जातात.

याशिवाय सर्वोत्कृष्ट विनोदी एकांकिका, सर्वोत्कृष्ट मायबोली एकांकिका, सर्वोत्कृष्ट लोककला आधारित एकांकिका, विनोदी अभिनेता आणि अभिनेत्री, सर्वोत्कृष्ट बालकलाकार अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. रायगड विभागासाठी प्राथमिक फेरीसाठी विशेष पारितोषिकांमध्ये प्रथम पारितोषिक १० हजार रु., द्वितीय सहा हजार रु. व तृतीय पारितोषिक चार हजार रु. देण्यात येणार आहे.


**शुध्दीपत्रक क्र. १**

**(ई-निविदा सूचना क्र. २८ सन २०२२-२३)**

**संदर्भ :- या कार्यालयाची ई-निविदा जा.क्र.अवि/लेशा/निविदा/६८६०/२०२२ दिनांक १४/११/२०२२**

| पुर्वीचा कालावधी | सुधारीत कालावधी |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दि. २४/११/२०२२ (स. १०.०० वा.) ते दि. ०८/१२/२०२२ (संध्या. ६.०० वा.) | ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दि. ०२/१२/२०२२ (स. १०.०० वा.) ते दि. १६/१२/२०२२ (संध्या. ६.०० वा.) |
| निविदापुर्व बैठक (अ.क्र. १ ते ३ कामांकरिता) :- मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दिनांक २९/११/२०२२ रोजी दु. ३.०० वा. | निविदापुर्व बैठक (अ.क्र. १ ते ३ कामांकरिता) :- मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दिनांक ०६/१२/२०२२ रोजी दु. ३.०० वा. |
| निविदापुर्व बैठक (अ.क्र. ४ ते ९ कामांकरिता):- मा. अधिक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ कोकण भवन, नवी मुंबई, यांचे दालनात दिनांक ३०/११/२०२२ रोजी दु. ३.०० वा. | निविदापुर्व बैठक (अ.क्र. ४ ते ९ कामांकरिता):- मा. अधिक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ कोकण भवन, नवी मुंबई, यांचे दालनात दिनांक ०७/१२/२०२२ रोजी दु. ३.०० वा. |
| ई-निविदा उघडणे :- दिनांक १४/१२/२०२२ (शक्य झाल्यास) | ई-निविदा उघडणे :- दिनांक २२/१२/२०२२ (शक्य झाल्यास) |

✻ निविदेतील/निविदा सुचनेतील इतर बदल महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावे ही विनंती.

जा.क्र.अवि/लेशा/निविदा/७२५३/२०२२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, अलिबाग, जि. रायगड
दिनांक : ३०/११/२०२२

**सही/-**
**(ज. ई. सुखदेवे)**
**कार्यकारी अभियंता,**
**अलिबाग (सा.बां.) विभाग,**
**जि. रायगड.**

## निवडक

### अपघातात तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** जेएनपीटी-पनवेल महामार्गावर टी पॉईंटजवळ अज्ञात वाहनाने मोटरसायकलस्वाराला धडक दिली. या अपघातामध्ये अरबाज कुडुम या तरुणाचा मृत्यू झाला आहे. पनवेलमध्ये राहणारा अरबाज जेएनपीटीमध्ये खासगी वाहनावर चालक म्हणून काम करत होता. रात्री कामावरून घरी परत येत असताना टी पॉईंट साई ढाब्याजवळ त्याच्या मोटरसायकलला वाहनाने धडक दिली. जखमी अरबाजला उपचारासाठी पनवेल ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तेथे त्याचा मृत्यू झाला. अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### स्टेशन परिसरातून दुचाकीची चोरी

**पनवेल :** रेल्वे स्टेशन परिसरातून दुचाकी चोरीस गेल्याची घटना घडली आहे. विचुंबे येथे राहणारे रोहित कांबळे यांनी त्यांची अॅक्टिव्हा (स्कूटर) (एमएच ४६ एए ६६८९) रेल्वे स्टेशनजवळ उभी केली होती. ती चोरीस गेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वडघर येथून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** वडघर येथे राहणारी एक विवाहिता महिला कोणास काहीएक न सांगता कोठेतरी निघून गेल्याने ती



हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मेणका मखखनलाल साहू (वय ३७) असे बेपत्ता महिलेचे नाव असून उंची पाच फूट, डोक्याचे केस काळे लांब, डोळे काळे, नाक सरळ पसरट, उजव्या हाताच्या मनगटावर मखखनलाल असे लिहिलेले आहे. शरीराने मध्यम असून अंगात सलवार व कमीज, पायात सॅन्डल आहे. तिला हिंदी भाषा बोलता येते. या महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा हवालदार ए. एस. डोईफोडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नवीन पनवेलला जोडणारा रेल्वेपूल धोकादायक

## तत्काळ दुरुस्तीची मागणी



**पनवेल : प्रतिनिधी**


नवीन पनवेलकरांनो सावधान, सकाळ-संध्याकाळी गर्दीच्या वेळी घरी किंवा कामावर जातांना बल्लारशहा सारखी दुर्घटना घडू शकते. पनवेल रेल्वे स्टेशन व नवीन पनवेलला जोडणाऱ्या पादचारीपूलचे लोखंडी पोल सडले आहेत. मालगाडी खालून गेल्यावर त्याला हादरे बसतात. सन २०१९ नंतर या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट झालेले नाही. त्यामुळे कधीही दुर्घटना घडू शकते.

पनवेल रेल्वे स्टेशनमधून नवीन पनवेलमध्ये जाण्यासाठी लोखंडी पादचारीपूल बांधण्यात आलेला आहे. लांब पल्ल्याच्या गाडीत बसण्यासाठी ही या पूलाचा वापर करावा लागतो. या पूलावरून रोज लाखो माणसे जात असतात. हा पूल ८०च्या दशकात बांधला आहे. या पुलाचे नवीन पनवेल बाजूकडून दूसरा आणि तिसरा लोखंडी खांब वरच्या बाजूला पूर्ण सडलेला आहे. या पूलाच्या खाली नवीन रेल्वे मार्गाचे काम सुरू असल्याने जेसीबी लावून तेथे खड्डे खणतानाही हादऱ्याने त्याच्या स्ट्रक्चरला धक्के बसले आहेत. पूला खालून मालगाडी गेल्यावर हादर्याने पूल हालतो याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. त्याबाबत पनवेल स्टेशन सल्लागार समितीच्या बैठकीत तक्रारही करण्यात आली होती, पण रेल्वे त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे गर्दीच्या वेळी वजन सहन न झाल्याने हा पूल केव्हाही मोडून पडून चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशहा येथील दुर्घटनेसारखी घटना घडू शकते.

पनवेल जंक्शनचे काम सुरू असल्याने त्यामध्ये नवीन पनवेलमध्ये जाण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्यात येणार आहे. त्याचे काम सुरू होते, पण खडक लागल्याने हे काम दोन वर्षांपूर्वी थांबवण्यात आले. सुरुंग न लावता खडक फोडण्याचे नवीन तंत्रज्ञान वापरण्यात येणार असल्याचे सांगितले जाते पण त्याला अद्याप मुहूर्त सापडलेला नाही. त्यामुळे हा पूल कोसळल्यास नवीन पनवेलला येण्यासाठी दूसरा मार्ग उपलब्ध नाही.

> या पुलाचे २०१९मध्ये स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे. आम्ही त्याची वेळोवेळी तपासणी करत असतो. आताही आमचे तपासणीचे काम सुरू आहे.
>
> -पी. एन. पाईकराव, सेक्शनल इंजिनियर, पनवेल (बांधकाम)

> आमच्याकडे एका महिलेने येऊन या रेल्वेपूलाबाबत माहिती देऊन तुम्ही काही तरी करा, असे सांगितल्यावर आम्ही जाऊन पाहिले त्यावेळी पुलाचे लोखंडी खांब गंजलेले आणि फाटलेले दिसून आले.
>
> -प्रकाश विचारे, अध्यक्ष, अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघ, नवीन पनवेल





**तुळई आणि स्तंभाच्या जोडणीच्या ठिकाणी स्तंभामध्ये गंज सुरू झाला आहे.**

**स्तंभ विभागाच्या क्रॉस सेक्शनल क्षेत्रामध्ये घट झाली आहे.**

**गंज वेब आणि लांबीच्या बाजूने फिरत आहे.**

**फ्लँजपैकी एक वेबपासून जवळजवळ विभक्त आहे.**

**जेव्हा एक्स्प्रेस आणि लोकल गाड्या एकाच वेळी येतात तेव्हा पादचारी मोठ्या प्रमाणात येत असल्याने मोठे वजन पूलावर येते.**

**अशावेळी पूलाच्या ताकदीचे हे कमी झालेले गुणधर्म कोणत्याही चेतावणी सिग्नलशिवाय अचानक अपयशी ठरू शकतात.**

**त्वरित दुरुस्ती किंवा कोणत्याही उपायाने हे टाळले जाऊ शकते असे एका प्रत्यदर्शी अभियंत्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.**

# कामोठ्यात शिवप्रताप दिवस साजरा

## परेश ठाकूर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे शहरात हिंदु तिथीनुसार बुधवारी (दि. ३०) श्री शिवप्रताप दिवस या भव्यदिव्य नैत्रदीपक सोहळ्याचे आयोजन एक शहर एक शोभायात्रा अंतर्गत श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या माध्यमातून करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या वेळी सुप्रसिद्ध मराठी अभिनेते आणि अफजल खान वध आपल्या वाणीतून अगदी डोळ्यासमोर जिवंत करणारे म्हणून ज्यांची ख्याती आहे, असे राहुल सोलापूरकर यांनी प्रतापगडचे मंत्रयुद्ध या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

या कार्यक्रमात भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा नेते हॅप्पी सिंग, युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, रवी गोवारी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, विकास घरत, माजी नगरसेविका कुसूम म्हात्रे, निता माळी यांच्यासह पनवेल, नवी मुंबईतील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



(छाया : अक्षय शार्दुल)

# भाजपकडून पुनाडे सरपंच पदासाठी अर्ज दाखल



**उरण : बातमीदार**

ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२२साठी पुनाडे गावातून (पुनाडे ग्रामपंचायतीसाठी) थेट सरपंचासाठी भारतीय जनता पक्षकडून सत्यवान गोविंद कातकरी यांनी उमेदवारी दाखल केला.

सदस्यासाठी प्रभाग क्रमांक १ मधून अंकिता अमीर ठाकूर, संजय प्रल्हाद पाटील तर प्रभाग क्रमांक २ साठी आयेशा महिंद्र डाकी, रसिक बाबुराव पाटील आणि प्रभाग क्रमांक ३ साठी शालिनी प्रसाद ठाकूर, महादेव परशुराम पाटील यांचा अर्ज दाखल करण्यात आले. या वेळी भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, उपाध्यक्ष नीलकंठ घरत, भाजप पुनाडे बुथ अध्यक्ष संदेश महादेव पाटील उपस्थित होते. या वेळी सर्व सभासदांचे अर्ज भरण्यात आले.

दरम्यान, १८ ग्रामपंचायतींच्या १६४ सदस्य पदाच्या जागांसाठी २०९ तर थेट जनतेतून निवडून येणाऱ्या १८ सरपंच पदासाठी ४६ असे एकूण २५५ इच्छुक उमेदवारांचे अर्ज गुरुवार (दि. १) पर्यंत दाखल झाले आहेत.

# न्हावा गावात विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील न्हावा गावामध्ये गटाराचे ड्रेनेज पाईपलाईन बसविणे व श्री गावधनी मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे या कामांचे भूमिपूजन गुरुवारी (दि. १) करण्यात आले.



या वेळी न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच प्रल्हाद पाटील, माजी सरपंच हनुमान भोईर, सदस्य सागरशेठ ठाकूर, किसन पाटील, देवेंद्र भोईर, अमृता पाटील, निर्मला ठाकूर, विजया ठाकूर, कल्पना ठाकूर, मंजूषा ठाकूर, साधना तांडेल, मिनाक्षी पाटील, रंजना घरत, कमलाबाई म्हात्रे, सुशीला पाटील, रोजी पिटर, रवी पाटील, कैलास पाटील, भगवान भोईर, दीपक भोईर, रचना भोईर, ओएनजीसी न्हावाचे जीएम हेड कानोजी सर, एचआर हेड ज्योती मॅडम, सेक्यूरीटी हेड ठाकूर सर, जसप्रित सिंग आदी उपस्थित होते.



# गोवर रूबेलाबाबत तळोजामध्ये जनजागृती



**पनवेल : प्रतिनिधी**

गोवर रूबेलाचा फैलाव होऊ नये यासाठी सर्व नागरिकांनी दक्ष राहावे. यापूर्वी आपण कोरोनावर मात केली आहे आता गोवर रुबेलाला पळवून लावू यासाठी घराघरात-परिसरात जनजागृती करा व लस घ्या, असे आवाहन पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी गुरुवारी (दि. १) तळोजा येथील नॅशनल उर्दू प्राथमिक, माध्यमिक शाळेत जनजागृती अभियानांतर्गत उपस्थित विद्यार्थी शिक्षक व पालक वर्गांना मार्गदर्शक करताना केले.



या वेळी व्यासपीठावर आयुक्तांसह पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उद्योजक इकबाल काझी, याकुब बेग माध्यमिक शाळेचे ट्रस्टी व माजी नगरसेवक मुकीद काझी, माजी नगरसेवक पापा पटेल, हरेश केणी, महापालिका प्रभारी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, डॉ. पटेल, डॉ. शेख, तळोजा येथील सामाजिक कार्यकर्ते आरिफ पटेल, जवाद पटेल, नाविद पटेल, ताहीर पटेल, मुनाफ सय्यद, उलमा कमिटी सदस्य, शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी बोलताना आयुक्त गणेश देशमुख यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना गोवर लसीकरण केले नाही तर पुढे जाऊन होणारे दुष्परिणाम आणि लसीकरणामुळे होणारे फायदे याची माहिती दिली. त्यासाठी लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले. तर पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उद्योजक इकबाल काझी यांनी सांगितले की, कोरोनाच्या काळामध्ये तळोजा भागात लसीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात झाले त्यामुळे या भागात कोरोनाचा ज्यादा फैलाव झाला नाही. आगामी काळात येथील नागरिक गोवर रुबेलासंदर्भात सुद्धा परिसरात जगजागृती करून आपल्या लहान मुलांचे लसीकरण करून घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी नगरसेवक मुकीद काझी यांनी बोलताना सांगितले की, लसीकरण ही चांगली गोष्ट आहे त्याचा फायदा सर्वांनाच होणार आहे. यासाठी सर्वांनी आपल्या मुलांची काळजी घ्यावी व त्यांच्याकडे गोवरची लक्षणे आढळल्यास तातडीने नजीकच्या वैद्यकीय विभागाकडे जाऊन लसीकरण करून घ्यावे. तसेच माजी नगरसेवक हरेश केणी यांनी सुद्धा लक्षणे दिल्यास त्वरित लसीकरण करून घ्या. जसा तळोजाकरांनी कोरोनाला पळवला तसेच गोवरला सुद्धा आपल्याला पळवायचा आहे. यासाठी पनवेल महापालिका जनजागृती अभियान मोठ्या प्रमाणात राबवित आहेत.




**उरण : श्री साई सेवा मंडळ उरण विभागाच्या वतीने श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री दत्त जयंती उत्सवानिमित्त श्री साई बाबांचा भव्य पायी पालखी वारकारी दिंडी पदयात्रा उरण येथून निघाली आहे. ही दिंडी डोंबिवली येथे पोहचल्यावर मंत्री रवींद्र चव्हाण यांनी भेट देऊन पालखीचे दर्शन घेतले. या वेळी दिंडीच्या वतीने मंत्री चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी दिंडीचे अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष अजित पाटील, चंद्रकांत म्हात्रे, जगदीश कडू, कार्याध्यक्ष राजेंद्र पाटील, सेक्रेटरी सुनील पाटील, सहखजिनदार दिलीप कडू, खजिनदार सुनील गोपिनाथ ठाकूर, सहसेक्रेटरी हरेश्वर ठाकूर आदींसह पदयात्री उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयात शालेय रांगोळी स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, देशाचे माजी कृषी मंत्री माननीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ८२व्या वाढदिवसानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाच्या वतीने 'कृतज्ञता सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. त्या अंतर्गत शालेय रांगोळी स्पर्धेचे आयोजन शालेय पातळीवर येथील रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये करण्यात आले.




इयत्ता पाचवी ते सातवी (लहान गट) व इयत्ता आठवी ते दहावी (मोठा गट) अशा दोन गटांमध्ये या रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. व्यक्तिचित्र - शरद पवार, कृषी व तंत्रज्ञान, आरोग्य व स्व्छता, वाहतूक व दळणवळण, पर्यावरण संवर्धन आणि डिजिटल इंडिया आदी विषय रांगोळी स्पपर्धेसाठी ठेवण्यात आले होते.

विद्यालयात झालेल्या या शालेय रांगोळी स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेचे नेटके नियोजन स्पर्धा प्रमुख अस्मिता पाटील-वर्तक, प्रणाली पाटील व संपदा म्हात्रे यांनी केले. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक तथा प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

विजेते स्पर्धक (मध्यम गट आठवी ते दहावी) प्रथम दिपीका सोपान माने, द्रितीय क्षितीजा संजय कांबळे, तृतीय आरती रामकृष्ण मोरे व अक्षरा सोमनाथ पाटील हे आहेत. सर्व यशस्वी व सहभागी विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

## संपादकीय

# महाराष्ट्रातही 'समान'तेची चाहूल

महाराष्ट्रातही आता समान नागरी कायद्याचे वारे वाहू लागले आहेत. राज्यातील प्रमुख भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे येत्या काळात राज्यात सर्वांना विशिष्ट पातळीवर समान अधिकार प्राप्त होण्याची चिन्हे आहेत.

**आपल्या देशात फौजदारी कायदा सर्वांसाठी समान आहे, पण नागरी कायद्यांमध्ये तफावत दिसून येते. वास्तविक संविधानाने समान नागरी कायद्याचे अधिकार दिले आहेत. लग्न, संपत्ती, वारसदार, घटस्फोट, मूल दत्तक घेणे यांसारखी कुटुंब किंवा व्यक्तीशी संबंधित प्रकरणे नागरी कायद्याच्या अंतर्गत येतात, मात्र आपल्या देशात नागरी कायद्यांमधील वेगवेगळ्या तरतुदींमुळे वाद निर्माण होत असतात. ते संपुष्टात आणण्यासाठी समान नागरी कायदा लागू करण्याची गरज दिल्ली उच्च न्यायालयाने व्यक्त केली होती. त्याआधीच चार वर्षांपासून हा कायदा लागू करण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने सत्ताधारी भाजपचे राष्ट्रीय पातळीवरील वरिष्ठ नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, पक्षाध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी याबाबत ऊहापोह करून भूमिका स्पष्ट केली आहे. घटनेतील कलम ४४ अन्वये समान नागरी कायदा लागू करण्याची जबाबदारी राज्यांची आहे. गोव्यात हा कायदा पोर्तुगीज काळापासून अस्तित्वात आहे. आता उत्तराखंडही हा कायदा लागू करीत आहे, तर हिमाचल प्रदेश, गुजरात ही राज्येदेखील त्यासाठी आवश्यक ती पावले उचलत लागू आहेत, पण काही राज्ये याबाबत मौन बाळगून आहेत. आपला देश विविध जाती, धर्म आणि समुदायांनी बनलेला आहे. या बहुस्तरीय रचनेमुळे कुणाला दुखवण्यास काही राज्यकर्ते तयार नाहीत, पण म्हणून अन्याय, अत्याचार सुरूच राहणे कितपत योग्य आहे, तर दुसरीकडे अल्पसंख्याक असलेल्या समाजांमध्ये प्रथा, परंपरा आहेत, पण महिलांना वडील किंवा पतीच्या संपत्तीवर तेवढा अधिकार नाही. समान नागरी कायदा लागू झाल्यास संपत्तीचे वाटप समसमान होईल. लग्न, घटस्फोट यावरही परिणाम होणार आहे. परिणामी त्यांचे विशेषत्व धोक्यात येण्याची भीती त्यांना वाटते. म्हणूनच समान नागरी कायद्यास त्यांचा विरोध आहे. काही विशिष्ट राजकारणी आणि संघटना हा विषय सामाजिक समतेच्या अंगाने पाहण्याऐवजी राजकीय आणि धार्मिक चष्म्यातून त्याकडे पाहत आले आहेत. त्यातून गैरसमज होऊन हा विषय संवेदनशील बनला. खरंतर तो कायद्यापलिकडे जाऊन मानवता धर्माच्या दृष्टिकोनातून समजून घेतला पाहिजे. भाजपने २०१९च्या जाहीरनाम्यात समान नागरी कायदा, जम्मू काश्मीर राज्यात लागू असलेले कलम ३७० रद्द करणे, अयोध्येत राममंदिराची उभारणी यांचा अंतर्भाव केला होता. भाजपच्या मूळ जाहीरनाम्यात जे होते त्यानुसार अयोध्येत मंदिराची उभारणी सुरू झाली आहे. जम्मू काश्मीर राज्याला विशेष दर्जा मिळवून देणारे कलम ३७० रद्द करण्यात आले आहे. आता महाराष्ट्र सरकारने समान नागरी कायद्याच्या दिशेने तयारी सुरू केली आहे. जात, धर्म, वंश, लिंग असा भेदभावाचा कुठलाही थारा नसलेला समान नागरी कायदा काळाची गरज आहे. सर्वांच्याच तो हिताचा आहे. म्हणूनच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, हळूहळू सर्व राज्ये हा कायदा लागू करतील. महाराष्ट्रही योग्यवेळी हा कायदा लागू करण्याबाबत विचार करेल, असे म्हटले आहे. सर्वत्र हा कायदा लागू झाल्यास संविधानाचा खऱ्या अर्थाने पुरस्कार होईल आणि सर्वांना न्याय मिळेल.**

# महाड विधानसभा निवडणुकीची पूर्वपरीक्षा

**महाड : महेश शिंदे**

महाड तालुक्यातील १३४ ग्रामपंचायती पैकी ७३ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूक होत असुन या निवडणुका म्हणजे महाड विधानसभा निवडणुकीची पूर्व परीक्षा आहे. महाड विधानसभा क्षेत्राचे राजकीय गणितं पूर्ण बदललेले असुन ठाकरे आणि शिंदे गटाच्या विभाजनामुळे महाड तालुक्यातील आघाडी काही प्रमाणात भक्कम होत असुन शिंदे गटाचे आमदार भरतशेठ गोगावले यांच्या अस्थित्वाच्या लढाईचा प्रश्न निर्माण झाला आहे. शिंदे गट आणि भाजप ही जरी तालुक्यात एकत्र लढत असली तरी स्थानिक स्तरावर राजकीय गणिते बदलत असतात. त्यामुळे या ७३ ग्रामपंचायतीमध्ये कोण बाजी मारतो यावर पुढी विधानसभेची गणिते अवलंबून आहेत.

आजच्या घडीला महाड नगरपालिका सोडल्यास तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायतीवर शिंदे गटाच्या आमदार भरतशेठ गोगावले यांचे वर्चस्व आहे. त्या खालोखाल काँग्रेस, भाजप आणि राष्ट्रवादचे बलाबल आहे, मात्र येत्या ग्रामपंचायत निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरे गटाची शिवसेना या तीन पक्षांची आघाडी एकत्रित या ग्रामपंचायतीच्या निवडणुका लढवीत आहे. तालुक्यात ठाकरे गटाचे प्राबल्यपण कमी आहे आणि त्यांना निवडणूकीसाठी आर्थिक रसद पुरवणारा नेतादेखील कोणीच नाही. केवळ ठाकरेंच्या भावनिक आवाहनावर हे ठाकरे सैनिक एकाकी लढत आहेत. त्या तुलनेने शिंदे गटासाठी आमदार भरतशेठ गोगावले, भाजपसाठी आणि राष्ट्रवादीसाठी ही आर्थिक रसद पुरविणारी यंत्रणा सक्षम आहे.




महाडच्या ग्रामपंचायत निवडणुकीत खरी रंगत तेव्हा चढेल जेव्हा खऱ्या अर्थाने शिंदे गट आणि भाजप एकत्र निवडणूक लढवेल. महाड तालुक्यातील मुस्लिम बहुल ग्रामपंचायतीमध्ये भाजपला सोबत घेऊन निवडणूक लढविण्याच्या मनस्थितीत शिंदे गट दिसत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरे गट हे या निवडणुकीत आपले अस्तित्व शोधताना दिसत आहेत. ते दोन्ही पक्ष या ग्रामपंचायत निवडणुकीत विशेष प्रभाव टाकू शकणार नाहीत.

एकंदरीत आजच्या घडीला शिंदे गट जरी १३४ ग्रामपंचायत निवडणुक लडविण्याची भाषा करीत असले तरी भाजपदेखील जवळपास ३६ ग्रामपंचायत लढविण्याच्या तयारीत आहेत.

दरम्यान, २८ नोव्हेंबरपासून जरी उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाला असला तरी शुक्रवार २ डिसेंबरला तालुक्यातील बहुतांश उमेदवार उमेदवारी अर्ज भरतील. बुधवार दिनांक ७ डिसेंबर रोजी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असुन या नंतरच युतीचे आणि आघाडीचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

### या ७३ ग्रामपंचायतींच्या निवडणुका

*महाड तालुक्यातील ७३ ग्रामपंचायतींच्या निवडणूका जाहीर झाल्या आहेत. यामध्ये अप्पर तुडील, आंबवडे, आचळोली, आढी, आदिस्ते, उंदेरी, करंजखोल, करंजाडी, कांबळे तर्फे बिरवाडी, कावळे तर्फे विन्हेरे, किंजळघर, कुंबळे, कुर्ले, कुसगाव, केंबुर्ली, कोझर, कोथेरी, कोल, कोळोसे, खुटील, गोंडाळे, गोठे बुद्रूक, घावरेकोंड, चांभारखिंड, चिंभावे, चिंभावे मोहल्ला, जुई बुद्रूक, तळीये, ताम्हाणे, दादली, दापोली, दासगावा, धामणे, नडगाव तर्फे तुडील, नडगाव तर्फे बिरवाडी, नांदगाव बुद्रूक, नागाव, नाते, नातोंडी, निगडे, पंदेरी, पाचाड, पारमाची, पाले, पिंपळवाडी, पुनाडे, फाळकेवाडी, बासरगाव, बिजघर, मोहोत, मोहोप्रे, राजिवली, रानवडी खुर्द, रावतळी, रूपवली, लाडवली, लोअरतुडील, वडवली, वरंध, वराठी, वहूर, वाघोली, वामणे, वारंगी, वाळणे खुर्द, वाळसुरे, वीर, शिरगाव, शिरवली, शिरसवणे, सावाणे, साकडी, सावरट या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.*

# आज जागतिक संगणकीय साक्षरता दिन

संगणकीय जागरूकता वाढविणे आणि वंचित समूहाच्या माहिती तंत्रज्ञानाच्या ज्ञानात वाढ करण्यासाठी दरवर्षी २ डिसेंबर रोजी जागतिक संगणक साक्षरता दिन साजरा करण्यात येतो. भारतीय संगणक कंपनी 'नीट'ने २००१ मध्ये २० व्या वर्धापन दिनानिमित्त या दिवसाची सुरुवात केली. २००१ पर्यंत जगभरातील बहुतेक संगणक वापरकर्ते पुरुष होते. मात्र, स्त्रिया व मुलांमध्ये संगणकीय ज्ञानाचा प्रचार करणे व त्यांना अधिकाधिक संगणक वापरण्याविषयी प्रोत्साहित करणे या उद्देशाने देखील जागतिक संगणकीय साक्षरता दिन साजरा करण्यात येतो.



मानवाच्या उत्क्रांतीचे टप्पे त्याच्या एकूणच विकासात भर टाकणारे असतात, अशातच संगणक क'ांती म्हणजेच मानवाच्या प्रगतीच्या मार्गाला मिळालेला एक सुवर्णमार्ग होय. आज सर्वच क्षेत्रांमध्ये आपले हक्काचे स्थान बजविणार्या संगणक आणि इंटरनेट यांच्या शोधामुळे मानवी जीवनात घडून आलेल्या या डिजिटल क्रांतीचा आढावा घेण्यासाठी देखील २ डिसेंबर हा दिवस संगणक साक्षर दिन म्हणून ओळखला जाऊ लागला.

अमेरिकेसार'या प्रगत व विकसित देशाने जेव्हा भारताला सुपर कॉम्प्युटरचे तंत्रज्ञान देण्याचे नाकारले तेव्हा परम् ८००० ची निर्मिती १९८० च्या सुमारास करण्यात आली. तसेच महासंगणक बनविणारी पहिली संस्था म्हणजे सी-डॅक. इतकेच नव्हे तर इंग्रजी भाषांव्यतिरिक्त अन्य भारतीय भाषा संगणकावर लिहिण्यासाठी 'इनस्कि'प्ट की-बोर्ड'ची निर्मिती करून भारतीय भाषेत संगणक उपलब्ध करून दिला.


आज असे कोणतेही क्षेत्र नाही ज्या क्षेत्रात संगणकाचा वापर केला जात नाही. शैक्षणिक विश्वातील 'क्लास रूम' ही संकल्पना या क्षेत्रातील महत्त्वाचे योगदान ठरली. आभासी नोंदणी, आभासी खरेदी, ई-बँकिंग यासार'या गोष्टींचा वापर स्मार्टफोनमध्ये करता येऊ लागल्याने कित्येक व्यवहार सोपे होऊ लागले. मात्र, या गोष्टी करण्यासाठी देखील संगणकीय साक्षरतेची आवश्यकता आहे. शहरी भागातील महाविद्यालयीन युवक-युवती किंवा दहावी-बारावीच्या मुलांना वर उल्लेखित व्यवहार सहज करता येतात. कारण ही पिढी तंत्रस्नेही आहे, मात्र ४०-५० च्या वर वय असलेल्या व्यक्तींना संगणकीय साक्षरतेची अधिक आवश्यकता आहे. तसेच आभासी फॉर्म भरणे, आभासी निकाल जाहीर करणे या सर्व गोष्टींमुळे आजच्या पिढीसोबतचे संगणकाचे नाते अधिकच दृढ झाले.

संगणक साक्षरता प्रत्येक विद्यार्थी, महिला यांच्यापर्यंत पोहचावी याकरिता सरकार नेहमीच प्रयत्नशील आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये मिळणारे संगणकाचे प्रशिक्षण मुलांसोबतच त्या खेड्यातील महिला वर्गालाही घेता येऊ लागले. जागोजागी 'डिजिटल स्कूल' निर्माण करून संगणकीय क्रांती करण्यात यश मिळू लागले. आज प्राथमिक वर्गापासून मिळणारे संगणकाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना उद्याचा उज्ज्वल भारत घडवण्यास नक्कीच मदत करणारे आहे. महाविद्यालयीन पातळीवर एमएससी, आयटीचे प्रशिक्षण बंधनकारक केल्यामुळे मुलांचे व्यावहारिक जगात वावरण्याचे तंत्र अधिकच सुकर झाले. वर्ड, एक्सेल, पॉवर पॉईंट यांसारख्या मूलभूत सॉफ्टवेअरची ओळख त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातही उपयोगी पडू लागली.

**(साभार : तरुण भारत नेट)**



## बदलते तंत्रज्ञान



# नवी व्यवस्थेमुळे स्पॅम कॉल्स, मेसेजेसपासून होणार सुटका

आपण ट्रायच्या (Telecom Regulatory Authority of India) कॉलर आयडी ॲपबद्दल अनेकदा ऐकले आहे. आता प्राधिकरणाने याबाबत अधिकृत माहिती दिली आहे. नुकतेच ट्रायने सांगितले की, ते अनेक प्रकारच्या टेक्नॉलॉजीवर काम करत आहेत, जे त्रासदायक कॉल आणि एसएमएस डिटेक्ट शकतात. ट्रायने म्हटले आहे की, यूसीसी (अनसोलिसीटेड कमर्शियल कम्युनिकेशन) किंवा पेस्की कम्युनिकेशन हे लोकांच्या समस्यांचे प्रमुख कारण आहे.

ट्रायने म्हटले आहे की, 'नोंदणीशिवाय टेलिमार्केटिंग कॉल करणाऱ्यांविरोधात आता तक्रारी दाखल केल्या जात आहेत. दुसरीकडे, यूसीसी एसएमएसच्या प्रकरणांमध्ये बरीच प्रगती झाली आहे. यूसीसी कॉल हीदेखील एक मोठी समस्या आहे. अत्यावश्यक बाबींमध्ये यूसीसी डिटेक्शन सिस्टीम, डिजिटल कॉन्स्टंट ॲक्विझिशनची तरतूद, हेडर आणि मेसेज टेम्प्लेट्स, इंटेलिजेंस स्क्रबिंग, एआय आणि मशीन लर्निंग यांचा समावेश आहे.

पेस्की कॉल आणि एसएमएस थांबवण्यासाठी, टीआरएआयने टेलिकॉम कमर्शियल कम्युनिकेशन्स कस्टमर प्रेफरन्स रेग्युलेशन २०१८ जारी केले आहे. या अंतर्गत, ब्लॉकचेनवर आधारित एक इकोसिस्टम तयार केली जाईल. टीआरएआय पूर्णपणे नवीन प्रणालीवर काम करत आहे, जेणेकरून मार्केटिंग कॉल्समध्ये घट करता येईल. यासोबतच एसएमएस आणि कॉलवर होणारी फसवणूक थांबवता येईल.

नवीन नियमांनुसार, सर्व कमर्शिअल प्रमोटर्स आणि टेलीमार्केटर यांना डीएलटी प्लॅटफॉर्मवर नोंदणी करावी लागेल. याशिवाय प्रमोशनल मेसेज पाठवण्यापूर्वी ग्राहकांच्या प्रेफरन्सला पाहावं लागेल. या फ्रेमवर्क अंतर्गत, २.५ लाख प्रिन्सिपलची नोंदणी करण्यात आली आहे, ज्यात ६ लाखांहून अधिक हेडर्स आणि सुमारे ५५ लाख मेलेज टेम्पलेट्स आहेत. ट्रायच्या म्हणण्यानुसार, या फ्रेमवर्कनंतर ग्राहकांच्या तक्रारी कमी झाल्या आहेत. तथापि, लोक अजूनही नोंदणीकृत नसलेल्या त्रासदायक कॉलमुळे त्रस्त आहेत. हे कॉल्स बंद करण्यासाठी आवश्यक पावले उचलली जात आहेत.

# मराठी कवी, लघुनिबंधकार अनंत काणेकर

अनंत काणेकर हे महाराष्ट्रातील मराठी कवी, लघुनिबंधकार आणि पत्रकार होते. अनंत काणेकर यांच्या स्मरणार्थ मुंबई विद्यापीठातर्फे व्याख्यानमाला चालवली जाते. महाराष्ट्र सरकार अनंत काणेकर यांना ललित लेखनाच्या पुस्तकासाठी पुरस्कार देते. आज त्यांच्या जन्मदिनानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून.

अनंत आत्माराम काणेकर यांचा जन्म २ डिसेंबर १९०५ रोजी मुंबईत झाला. त्यांचे बीए एलएलबीपर्यंतचे सर्व शिक्षण मुंबईत झाले. वकिलीची पदवी मिळवूनही वकील होण्यापेक्षा त्यांनी शिक्षण क्षेत्रात उतरणे पसंत केले. त्यांनी मुंबईच्या सिद्धार्थ कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक म्हणून काम केले होते. त्यांनी काही काळ 'चित्रा' साप्ताहिकाचे संपादक म्हणूनही काम केले.

काणेकर हे सर्वप्रथम कवी या नात्याने मराठी रसिकांपुढे आले. 'चांदरात आणि इतर कविता' या त्यांच्या काव्यसंग्रहाने एक प्रतिभासंपन्न कवी म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली. त्यांच्या कवितेचे प्रमुख वैशिष्ट्य असे की, ती पूर्णपणे स्वतंत्र होती. तिच्यावर अन्य कोणत्याही पूर्वसुरीची छाप नव्हती. पुढील काळात काणेकर लघुनिबंधाच्या प्रांताकडे वळले आणि तो प्रांत त्यांनी जवळजवळ काबीजच केला.



कवी म्हणून काणेकर पहिल्यांदा मराठी रसिकांच्या नजरेस आले. त्यांच्या 'चांदरात आणि इतर कविता' या कवितासंग्रहाने ते प्रतिभावान कवी म्हणून प्रसिद्ध झाले. १९३४ मध्ये प्रसिद्ध झालेला 'पिकली पाने' हा त्यांचा पहिला लघुनिबंधसंग्रह. त्यानंतर त्यांच्या लघुनिबंधांचे अनेक संग्रह प्रसिद्ध झाले. आदर्श लघुनिबंधाची सर्व गुणवैशिष्ट्ये आपणास काणेकरांच्या लघुनिबंधात पाहावयास मिळतात. वाचकांना अंतर्मुख बनविण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात आहे. त्यांच्या जीवनवादी दृष्टिकोनाने तर त्यांच्या लेखनाला अधिकच प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

काणेकरांचे लघुनिबंध मराठी भाषेचे भूषण बनून राहिले आहेत. अनंत पुरोगामी लेखक म्हणून ओळखले जातात. त्यांच्यावर समाजवादी विचारांचा प्रभाव होता. त्यांच्या पुरोगामी दृष्टिकोनाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात पडणे स्वाभाविकच होते; म्हणूनच त्यांच्या सर्व लेखनात सामान्य माणसाविषयी त्यांना वाटत असलेला जिव्हाळा व आपलेपणा प्रत्ययास येतो. काणेकरांनी लघुकथा व प्रवासवर्णनेही लिहिली आहेत. 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' हे त्यांचे प्रवासवर्णन खूपच गाजले होते याशिवाय आणखीही काही प्रवासवर्णनपर ग्रंथ त्यांच्या खात्यावर जमा आहेत.

अनंत काणेकर यांची महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. ते या अकादमीचे सदस्यही होते. १९५७ मध्ये औरंगाबाद येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. १९६५ मध्ये त्यांना भारत सरकारने पद्मश्री किताबाने सन्मानित केले. अनंत काणेकर यांचे ४ मे १९८० रोजी निधन झाले.

अनंत काणेकर हे मुंबईतील वांद्रे येथील साहित्य सहवास वसाहतीत 'झपूर्झा' या इमारतीत रहात. काणेकरांच्या निधनानंतरही त्यांच्या पत्नी कमल या तेथे रहात होत्या. कमल काणेकर यांचे वयाच्या ९०व्या वर्षी १८ जानेवारी २००८ रोजी निधन झाले. त्यांना दोन मुली, एक मुलगा व नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी 'अनन्वय' या अनंत काणेकरांच्या आठवणींच्या पुस्तकाचे संपादन केले. अनंत काणेकर यांच्या स्मरणार्थ मुंबई विद्यापीठ एक व्याख्यानमाला चालवते.

**अनंत काणेकर यांची पुस्तके**

चांदरात आणि इतर कविता (काव्यसंग्रह), पिकली पाने, शिंपले आणि मोती, तुटलेले तारे, उघड्या खिडक्या, राखेतले निखारे, बोलका ढलपा (लघुनिबंधसंग्रह), दिव्यावरती अंधेर (लघुकथासंग्रह), धुक्यातून लाल ताऱ्याकडे, आमची माती आमचे आकाश, निळे डोंगर तांबडी माती.

**(साभार : मराठी फोनडिया व विकीपिडीया)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : महापालिकेच्या माध्यमातून पालिका हद्दीतील गावागावात सातत्याने स्वच्छता राखली जाते. हे दृश्य आहे धरणा कॅम्प गावातील सकाळच्या वेळेत पालिका स्वच्छतादूत मन लावून गावात सफाई करत असतानाचे.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर



# फास्ट फूड खाल्ल्याने होऊ शकते शरीराचे नुकसान

जर तुम्हालाही फास्ट फूड अथवा जंक फूड खायची आवड असेल तर आजच सावध व्हा. कारण बऱ्याच काळापर्यंत पिझ्झा, बर्गर, बिस्किट्स, कोल्ड-ड्रिंक्स आणि विविध प्रकारचे अल्ट्रा-प्रोसेस्ड पदार्थ खाल्ल्याने आतड्याचा कॅन्सर व्हायचा धोका असतो. हा आजार कौटुंबिक इतिहास, वाढते वय आणि खराब जीवनशैली यांच्याशी निगडीत आहे. एका संशोधनात आढळून आले की, एखाद्या व्यक्तीची जीवनशैली बऱ्याच कालावधीपर्यंत खराब असेल तर त्या व्यक्तीला कॅन्सर होऊ शकतो.

अल्ट्रा-प्रोसेस्ड अन्नपदार्थांचे सेवन करणाऱ्या २९ टक्के पुरुषांना हा आजार होण्याची शक्यता असते, असे या संशोधनात आढळून आले. तर ज्या महिला जास्त प्रमाणात रेडी टू इट फूडचे सेवन करतात त्यांना आतड्यांच्या कॅन्सरचा धोका १७ टक्के वाढल्याचेही शास्त्रज्ञांना आढळले.

अल्ट्रा-प्रोसेस्ड पदार्थ त्यांना म्हणतात, ज्या पदार्थांमध्ये असे घटक असतात जे आपण सामान्यत: घरी स्वयंपाक करताना वापरत नाही. उदाहरणार्थ, केमिकल्स आणि स्वीटनर, ज्यामुळे शरीराचे बरेच नुकसान होते. अल्ट्रा प्रोसेस्ड आणि प्रोसेस्ड फूडमध्ये फरक आहे. प्रक्रिया केलेल्या म्हणजेच प्रोसेस्ड फूडमध्ये गरम करणे, गोठविणे, डायसिंग, रसाळ अन्न यांचा समावेश होतो. प्रक्रिया केलेले अन्न आपल्यासाठी इतके हानिकारक ठरत नाही.

सामान्य स्तरावर खाल्ले जाणारे कॉमन अल्ट्रा-प्रोसेस्ड पदार्थ इन्स्टंट नूडल्स व सूप, रेडी टू ईट पदार्थ, पॅक्ड स्नॅक्स, कोल्ड ड्रिंक्स, केक, बिस्किट्स , मिठाई, पिझ्झा, पास्ता, बर्गर हे पदार्थ स्वस्त असतात. एका संशोधनात शास्त्रज्ञांना असे आढळले की, जे लोक अनहेल्दी डाएट व अल्ट्रा-प्रोसेस्ड फूडचे सेवन करतात त्यांच्यात मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे अल्ट्रा प्रोसेस्ड पदार्थ दूरच ठेवावेत, असे शास्त्रज्ञांनी नमूद केले आहे.

बहुतांश अल्ट्रा-प्रोसेस्ड पदार्थांमध्ये भरपूर चरबी, साखर आणि मीठ असते. मात्र आपल्या आरोग्यासाठी आवश्यक असणारे फायबर आणि पोषक तत्वं यांचा अशा पदार्थांमध्ये अभाव असतो. तुम्हालाही असे अनहेल्दी पदार्थ खाणं टाळायचं असेल त्यासाठी निश्चय करून कठोर डाएट करावे लागेल. आपल्या आरोग्यास फायदा होईल अशाच अन्न पदार्थांचे सेवन केले पाहिजे.

**(टिप : कोणताही उपचार करण्याआधी संबंधित आजारातील, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या.)**

# भाजपच्या रतिकांत पाटील यांचा सरपंचपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल



**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील नारंगी ग्रामपंचायतीच्या थेट सरपंच पदासाठी भारतीय जनता पक्षाचे रतिकांत पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला, तर ग्रामपंचायत सदस्य पदासाठी अनिता संदेश म्हात्रे, रूपाली पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

भाजपचे अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, सतिश लेले, संतोष पाटील, जान्हवी पारेख, निखिल चव्हाण, अशोक नानची, शैलेश नाईक, पंकज अंजारा, मितेश पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

## रोह्यात सरपंचपदासाठी एकूण सहा तर सदस्यपदासाठी २२ उमेदवारी अर्ज

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका येत्या १८ डिसेंबर रोजी होत असून त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी बुधवारी (दि. ३०) ग्रामपंचायत सदस्य पदासाठी एकूण सात उमेदवारी अर्ज दाखल झाले, तर थेट सरपंच पदासाठी एकही अर्ज दाखल झाला नाही.

रोहा तालुक्यात थेट सरपंच पदासाठी पाच आणि ग्रापंचायत सदस्य पदाच्या एकूण ३७ जागांसाठी निवडणूक होत आहे. २८ नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. बुधवारी ग्रामपंचायत सदस्य पदासाठी खैरेखुर्द येथे दोन, पुई येथे तीन व दापोली येथे दोन उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.

रोहा तालुक्यात आतापर्यंत थेट सरपंच पदासाठी एकूण सहा तर सदस्य पदांसाठी २२ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

# मुंबई-पुणे महामार्गावर टँकर उलटला

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**



मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरन आडोशी बोगद्याजवळ गुरुवारी (दि. १) सायंकाळी मुंबईला जाणारा रसायन भरलेला टँकर उलटल्याने मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

ज्वलनशील व घातक रसायन भरलेला टँकर गुरुवारी संध्याकाळी द्रुतगती मार्गावरून मुंबईकडे जात होता. आडोशी बोगद्याजवळ हा टँकर द्रुतगती मार्गावर उलटला. त्यात ज्वलनशील व घातक रसायन असल्याने खबरदारी म्हणून मुंबईला जाणारी वाहतूक काहीकाळ थांबून पुणे मार्गावर दुहेरी वाहतूक सुरू करण्यात आली होती. अपघाताचे वृत्त समजतात आयआरबी यंत्रणा, देवदूत, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते, महामार्ग व खोपोली पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

याच वेळी रसायन तज्ज्ञ धनंजय गीध यांनाही पाचारण करण्यात आले. त्यांनी टँकरमधून गळती होत नसल्याचे सांगितल्यानंतर पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली. क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त टँकर रस्त्याच्या एका बाजूला करण्यात आला. या वेळी सर्व सुरक्षायंत्रणा तयार ठेवण्यात आल्या होत्या. खोपोली अग्निशामक दलाचे पथकही तैनात ठेवण्यात आले.

टँकरमधील ज्वलनशील व घातक रसायन अन्य टँकरमध्ये भरण्यासाठी जेएनपीटीकडून ट्रेलर मागविण्यात आला आहे, मात्र त्याला उशीर होणार असल्यामुळे ही प्रक्रिया काळोखात न करता शुक्रवारी सकाळी करण्याचे निश्चित करण्यात आले.

# पोलादपुरमध्ये श्रीसदस्यांनी राबविले स्वच्छता अभियान





(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने पोलादपूर येथील श्री सदस्यांनी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी स्वच्छता अभियान राबविण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार रविवारी (दि. २७) सकाळी पोलादपुरातील श्री समर्थ बैठक हॉल परिसर ते रिक्षा स्थानक या दोन किमी रस्त्याची दुतर्फा स्वच्छता मोहीम राबविली.

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने आगामी काळातदेखील प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी स्वच्छता अभियान राबवले जाणार असल्याची माहिती पोलादपूर येथील श्री सदस्यांनी दिली.

पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी, उमेशदादा धर्माधिकारी व राहुलदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी सकाळी पोलादपूर शहरात राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत ५८ श्री सदस्य सहभागी झाले होते. त्यांनी २०० किलो सुका कचरा व ३०० किलो ओला कचरा गोळा केला व त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली.

# मुरूड सुपारी संघाची निवडणूक लांबणीवर



**मुरूड : प्रतिनिधी**

तीन कोटींची वार्षिक उलाढाल असणाऱ्या मुरूड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाची निवडणूक लांबणीवर गेल्याने उत्सुक उमेदवारांचा हिरमोड झाला आहे.

अ आणि ब वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार मुरूड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीला २० डिसेंबरपर्यंत स्थगिती देण्यात आल्याची माहिती सहकारी संस्थांचे ए. आर. प्रशांत पाटील यांनी पत्रकारांना दिली.

मुरूड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाचे १३०६ सभासद असून दर पाच वर्षाने या संघाची निवडणूक होत असते. विविध भागातून १७ संचालक निवडून दिले जातात. निवडून आलेले संचालक चेअरमनची निवड करतात. मुरूड सुपारी संघाची पंचवार्षिक निवडणूक १० डिसेंबरला होणार होती. त्यासाठी आतापर्यंत ४० उमेदवारी अर्ज सहाय्यक निबंधक श्रीकांत पाटील यांच्याकडे दाखल झाले होते. या अर्जाची छाननीही झाली होती. त्यात सर्व अर्ज वैध ठरले होते. गुरुवारी (दि. १) उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे कोण माघार घेणार याची मोठी उत्सुकता होती, मात्र निवडणुकीला स्थगिती आल्याने सर्वांचा हिरमोड झाला आहे.

# नेरळमध्ये हुतात्मा भाई कोतवाल यांना अभिवादन

**कर्जत : प्रतिनिधी**

हुतात्मा भाई कोतवाल यांच्या ११० व्या जयंतीनिमित्त कर्जत तालुक्यात गुरुवारी (दि. १) अनेक ठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात आले. नेरळ येथील हुतात्मा चौकात असलेल्या अर्धपुतळ्याला हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील माथेरान नाका येथे हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या अर्धपुतळा तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे शिल्प उभारले आहे. या हुतात्मा चौकात हुतात्मा भाई कोतवाल यांना गुरुवारी सकाळी अभिवादन करण्यात आले. नेरळ ग्रामपंचायत सदस्य नितीन निरगुडे, नेरळ व्यापारी फेडरेशनचे माजी अध्यक्ष कमलेश ठक्कर व बंडू क्षीरसागर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. स्मारक समितीचे अध्यक्ष संतोष पेरणे, उपाध्यक्ष दर्वेश पालकर, समिती सदस्य गणेश पवार, अजय गायकवाड, सुमित क्षीरसागर, नेरळ–माथेरान टॅक्सी संघटनेचे मनोहर तरे, बंडू देशमुख, भगवान जामघरे, प्रीतम गोरी आदी या वेळी उपस्थित होते.



(छाया : विजय मांडे)


**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**ई-निविदा सूचना (द्वितीय वेळ)**
**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब–१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहे.

| अनु. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय (GST सोडून) | निविदा अनामत रक्कम (रु.) | कोरी ई निविदा किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पमपा/विद्युत/५९/२०२२ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसित केलेल्या खारघर नोडमधील पारंपारिक पथदिवे बदलून नवीन LED पथदिवे लावणे व पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधीकरीता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरणे करणे. | १२,२७,६३,१८२/– | ५,५६,८६३/– | ३५४०/– |
| २ | पमपा/विद्युत/६२/२०२२ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसित केलेल्या नवीन पनवेल (पूर्व व पश्चिम) व काळुंद्रे नोडमधील पारंपारिक पथदिवे बदलून नवीन LED पथदिवे लावणे व पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधी करीता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरणे करणे. | ११,०९,३७,६१०/– | ४,८८,२४३/– | ३५४०/– |

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेतस्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

जा.क्र.पमपा/विद्युत/९९२२/प्र.क्र.१००/१०५१/२०२२
दिनांक :– ०१/१२/२०२२

सही/–
विद्युत विभाग प्रमुख
पनवेल महानगरपालिका



**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थांचा सन २०२२ ते २०२७ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थांची नावे– १. एकविरा नागरी सहकारी पतसंस्था मर्या, खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड २. खांदेश्वर ग्राहक सहकारी संस्था मर्या., खांदा कॉलनी, ता. पनवेल, ३. साईराज गोल्डन व्ह्यू सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित सर्व्हे नं. १२३ /अ, हिस्सा नं ८ब १, कोळखे पेठ ता. पनवेल जि. रायगड ४. हायकल कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड ५. श्री ओमकारेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्या, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि.०५/१२/२०२२ ते दि.०९/१२/२०२२, नामनिर्देशन पत्र छाननी दि. १३/१२/२०२२, नामनिर्देशन माघारी दि. १४/१२/२०२२ ते दि.२७/१२/२०२२ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दि.०५/०१/२०२३, दि.०४/०१/२०२३, दि. ०८/०१/२०२३, दि.०३/०१/२०२३ व दि. ०६/०१/२०२३ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, पहिला मजला कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, रायगड बाजारच्या बाजुला, पनवेल, जि.रायगड–४१०२०६ यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/१२/२०२२

सही/– (विजय सडके) निवडणूक निर्णय अधिकारी

सही/– (निती पुगांवकर) निवडणूक निर्णय अधिकारी,


# साळाव येथे जलकुंभाचे भूमिपूजन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जेएसडब्ल्यू कंपनी सीएसआर विभाग आणि साळाव ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने साळाव गावात जलकुंभ उभारण्यात येणार आहे. या जलकुंभाच्या कामाचे भूमिपूजन नुकतेच सरपंच निलिमा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

साळाव गावात १.५० लक्ष लिटर पाणी साठवण क्षमतेचा जलकुंभ उंचावर उभारण्यात येणार आहे. त्याद्वारे ग्रामस्थांना पुरेशा दाबाने मुबलक व शुद्ध पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे. या जलकुंभ कामाच्या भूमिपूजन समारंभाला जेएसडब्ल्यू कंपनी सीएसआर विभाग प्रमुख राम मोहिते, राकेश चवरकर, ग्रामविकास अधिकारी चेतन मगर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जिल्हा रुग्णालय येथील सिटीस्कॅन मशिन सर्वसामान्य रुग्णांसाठी कार्यान्वित

**अलिबाग :** येथील जिल्हा रुग्णालयाच्या क्ष–किरण विभागातील सिटीस्कॅन मशिन २३ नोव्हेंबर २०२२ पासून तांत्रिक बिघाडामुळे बंद होती. या मशिनची दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत अलिबाग जिल्हा रुग्णालयातील सिटीस्कॅन मशिन सर्वसामान्य रुग्णांसाठी कार्यान्वित करण्यात आली आहे.

भविष्यात जिल्हा रुग्णालयातील सिटीस्कॅन मशिन तांत्रिक कारणामुळे बंद झाल्यास अलिबागमधील लोटस सिटीस्कॅन व एमआरआय केंद्रासोबत सामंजस्य करार करुन अनसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना सिटीस्कॅन चाचणी सुविधा मोफत पुरविण्याबाबत आरकेएसमधून मंजूर करण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांनी दिली आहे.


**महाराष्ट्र शासन**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड**
web -kidc.maharashtra.etenders.in & email - eerid24@gmail.com
**ई-निविदा सूचना क्र. ०७ सन २०२२-२३**

**कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड** (दूरध्वनी क्र. ०२१९४/२५०८५७) महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा खात्याकडे प्रस्तावित खालील कामांकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब.१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https:mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची निविदा किंमत | इसारा/बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई–निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | माणगाव शाखा कालव्यावरील सा.क्र.२४/३४२ मी. (पन्हाळघर) येथे नदीवर नवीन पुल (Causeway) बांधणे. | ३३६०८३८/– | ३३७००/– | ६ महिने | रु. २०००/– + रु. ३६०/– = २३६०/– (ना–परतावा) | वर्ग ५ व त्यावरील |
| २ | मोर्बा शाखा कालवा सा.क्र.१०/२५० मी. ते ११/०७२ मी. येथील डीपकट पोर्शन मध्ये साफसफाई व स्लोप ट्रीटमेंट करणे. | २०६७१६१/– | २०७००/– | ६ महिने | रु. २०००/– + रु. ३६०/– = २३६०/– (ना–परतावा) | वर्ग ५अ व त्यावरील |
| ३ | पाली सिंचन शाखेतील सिंचन व्यवस्थापन आणि धरण देखभाल व दुरुस्तीसाठी अकुशल मजूर पुरवठा करणे. | २०२१८८४/– | २०३००/– | १२ महिने | रु. २०००/– + रु. ३६०/– = २३६०/– (ना–परतावा) | वर्ग ६ व त्यावरील |
| ४ | हेटवणे डावा तीर कालवा सा.क्र.१/७९५ मी., २/३३५ मी., व ४/१७० मी. येथील ह्युम पाईप मोरीची दुरुस्ती करणे व त्याठिकाणी अस्तरीकरण करणे. ता. पेण, जि. रायगड. | १२४६४२५/– | १२५००/– | ६ महिने | रु. २०००/– + रु. ३६०/– = २३६०/– (ना–परतावा) | वर्ग ६ व त्यावरील |

१. कोरा सक्षमता दस्तऐवज महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. ०७/१२/२०२२ ते २१/१२/२०२२** या कालावधीत १८.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे.
२. निविदाकारांवर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन संदर्भात व डिजिटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील टोल फ्री दूरध्वनी क्र. १८०० ३०७० २२३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.
३. एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेला आहे.

**टिप :– निविदा भरताना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधित विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.**

**विमाका/कोवि/२०२२–२०२३/१७९**

सही/–
(इंजि. दिनेश्री राजभोज)
कार्यकारी अभियंता,
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fees**: Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000025362** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-50/2022-2023.** RFx e-tender for providing and fixing of rainguard for Buchholz Relay and PRVs at various substations under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 3,03,723/-, **EMD:** Rs. 5,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 02.12.2022, 18:00 Hrs to 11.12.2022, 23:59 Hrs |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 11.12.2022 up to 23:59 Hrs |
| 4 | Online Opening of the Techno Commercial RFx | 12.12.2022 at 11:00 Hrs (If Possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in** **Contact Person:** The Add'l. Executive Engineer, (O): Phone No. 022- 2746 5410. **Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fees**: Rs.500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000025353** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/E-Tender-49/2022-2023.** RFx E-Tender for providing and installation of LED Panel Light for false ceiling at 100 KV Taloja substation and Panvel Division Office, under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 2,57,468/-, **EMD:** Rs. 5,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | From : 02.12.2022, 18:00 Hrs to 11.12.2022, 23:59 Hrs |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 11.12.2022 up to 23:59 Hrs |
| 4 | Online Opening of the Techno Commercial RFx | 12.12.2022 at 11:00 Hrs (If Possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in** **Contact Person:** The Addl. Executive Engineer, (O): Phone No. 022- 2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

# गोवर प्रतिबंध लसीकरणावर भर

## नवी मुंबई महापालिका बैठकीत नियोजन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

लसीकरण हा गोवर नियंत्रणासाठी प्रभावी उपाय असून त्यादृष्टीने अधिक व्यापक स्वरुपात लसीकरणावर भर दयावा व गोवरचे रुग्ण आढळत आहेत अशा गोवर प्रभावित क्षेत्रात अधिक लक्ष केंद्रित करावे असे निर्देश आरोग्य विभागाला देत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी नागरिकांनीही आपल्या सहा महिने ते पाच वर्षांतील बालकांचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन केले.

विविध शहरांमध्ये गोवरचा प्रभाव वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर नमुंमपा नियमित लसीकरण टास्क फोर्सची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी महापालिका आयुक्त श्री. राजेश नार्वेकर यांनी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गोवर स्थितीची सविस्तर माहिती घेतली व नवी मुंबईतील परिस्थिती नियंत्रणात राहण्यासाठी अधिक गतीमानतेने कृतीशील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पाटील तसेच जागतिक आरोग्य संघटनेचे विशेष समन्वयक डॉ अरुण काटकर, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी, बालरोग तज्ज्ञ संघटनांचे पदाधिकारी व महापालिका रुग्णालयांचे वैदयकिय अधिक्षक




आणि वैदयकिय अधिकारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये जागतिक आरोग्य संघटनेचे विशेष समन्वयक डॉ अरुण काटकर यांनी गोवर रुबेला दुरीकरण करण्याकरीता गोवर आजार, शाळांमार्फत करावयाच्या उपाययोजना, केंद्रिय समितीची भेट अणि शिफारशी याबाबत सादरीकरणाव्दारे माहिती दिली. वैदयकिय अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण यांनी नमुंमपा क्षेत्रातील गोवर रुबेला आजाराबाबतची स्थिती व उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती दिली.

नवी मुंबईमध्ये सुरूवातीपासूनच सातत्याने लसीकरण सुरू ठेवल्याने गोवर बाधितांचे प्रमाण काहीसे मर्यादित असल्याचे दिसून येते. महापालिका क्षेत्रात ११ ठिकाणी गोवरचा प्रभाव दिसून आला असून त्यामधील ३ क्षेत्रातील प्रभाव खंडीत करण्यात आला आहे. उर्वरित आठ क्षेत्रांपैकी जुहूगाव, सीबीडी बेलापूर, करावे, पावणे या नागरी आरोग्य केंद्र परिसरातील चार क्षेत्रे गोवर प्रभावित क्षेत्रे म्हणून घोषित करण्यात येऊन त्याठिकाणी विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या आदेशानुसार गोवरचा नवीन रुग्ण आढळल्यास त्या भागात नऊ महिने ते पाच वर्ष वयाच्या बालकांना मिझेल रुबेलो लसीचा एक अतिरिक्त डोस देण्याचे सूचित करण्यात आले असून त्यानुसार जुहूगाव, सीबीडी बेलापूर, करावे, पावणे या चार नागरी आरोग्य केंद्रांच्या गोवर प्रभावित परिसरात एमआर लसीचा एक अतिरिक्त डोस देण्याचे निश्चित करण्यात आले. त्याचप्रमाणे जुहूगाव, सीबीडी बेलापूर, करावे या तीन क्षेत्रातील सहा ते नऊ महिने वयाच्या बालकास एमआर लसीचा झिरो डोस देण्याचा निर्णय घेण्यात आला. यापुढील काळात अशा प्रकारची गोवर प्रभावित क्षेत्रे आढळून आल्यास त्या ठिकाणीही याच निकषानुसार कारवाई करण्यास मान्यता देण्यात आली.

### अतिरिक्त डोससंदर्भात तयारी

**नागरी आरोग्य केंद्र, जुहूगाव, सीबीडी बेलापूर, करावे, पावणे यांच्यामार्फत आपापल्या गोवर प्रभावी परिसरात अतिरिक्त डोस देण्याबाबतची तयारी पूर्ण झाली आहे. यात सहा ते नऊ महिने वर्षांतील ८४५ बालके व नऊ महिने ते पाच वर्ष वयाची १३०९८ बालके असे एकूण १३९४३ बालकांचे उदिष्ट नजरेसमोर ठेवून १ डिसेंबर रोजी २४, २ डिसेंबर रोजी २९ व ३ डिसेंबर रोजी ३० अशाप्रकारे आगामी तीन दिवसांत ८३ अतिरिक्त लसीकरण सत्रांचे नियोजन करण्यात आले आहे.**

**गोवर हा विषाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार असून या रोगाची लक्षणे आढळल्यास घाबरुन न जाता महानगरपालिकेच्या नजिकच्या नागरी प्राथमिक केंद्राला अथवा महापालिका रुग्णालयाला भेट दयावी. त्याचप्रमाणे गोवरचा उद्रेक प्रतिबंधासाठी आपल्या घरांना भेटी देणाऱ्या महापालिका आरोग्य विभागाच्या स्वयंसेवकांना सत्य माहिती दयावी व संपूर्ण सहकार्य करावे.**

**–राजेश नार्वेकर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांना कायम नोकरीत समाविष्ट करा

## आमदार मंदा म्हात्रे यांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील करारपद्धतीवरील विविध संवर्गातील प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेमध्ये सामावून घेणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे त्वरित पाठविण्यात यावा, अशी मागणी नवी मुंबई मनपा प्रशासनाकडे करण्यात आली असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी बेलापूर येथे पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. या वेळी भाजपचे महामंत्री विजय घाटे, भाजप युवा मोर्चा नवी मुंबई अध्यक्ष दत्ता घंगाळे आदी उपस्थित होते.



आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, नवी मुंबई महापालिका आस्थापनेवरील करार पद्धतीवरील विविध संवर्गातील नवी मुंबई प्रकल्पग्रस्त कर्मचारी करारपद्धतीवर सहा महिन्यांच्या नियुक्ती आदेशान्वये किमान वेतनावर गेल्या १५ वर्षांपासून नवी मुंबई महापालिकेमध्ये तुटपुंज्या पगारामध्ये अविरत सेवा बजावित आहेत. बहुतांश कर्मचाऱ्यांचे इतर ठिकाणी नोकरी करण्याचे वयदेखील निघून गेलेले आहे. सर्व कर्मचारी नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रामाणिकपणे आपली सेवा बजावत असून सदयस्थितीत नवी मुंबई महापालिकेमध्ये गेल्या दोन वर्षांपासून बहुतांश अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असल्याने तसेच बहुतांश लिपिक कर्मचाऱ्यांची वरिष्ठ लिपिक व कर निरीक्षक या पदावर पदोन्नती करण्यात आलेली असल्याने लिपिक संवर्गातील बहुतांश पदे रिकामी आहेत.

नवी मुंबई शहर वसविताना येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी आपल्या शंभर टक्के जमिनी दिल्या आहेत. स्थानिक प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी करण्याची गरज असताना बारवी धरणग्रस्तांच्या विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या आदेशान्वये नवी मुंबई महापालिकेध्ये कायमस्वरुपी थेट नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्याचधर्तीवर गेल्या अनेक वर्षापासून नवी मुंबई महापालिकेमध्ये विविध संवर्गात कार्यरत असणाऱ्या प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांनादेखील नवी मुंबई महापालिकेमध्ये कायमस्वरुपी करणे गरजेचे आहे. याकरिता अधिसंख्या पद निर्माण करण्यास मान्यता देण्याची आवश्यकता असून आस्थापना खर्चातून सूट देणे किंवा नवीन आकृतीबंधात ही पदे मंजूर करून देणे आवश्यक आहे. विहित मार्गाने निवड प्रक्रिया झालेली नसली तरीही गेली ७ ते १५ वर्षे कर्मचारी महापालिकेत काम करत असल्याने विशेष बाब म्हणून कायम करण्यात यावे तसेच शैक्षणिक अहर्ता शिथिल करणे गरजेचे आहे.

याबाबत आपण प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविल्यास सदर सर्व प्रकल्पग्रस्त कर्मचारी कायमस्वरूपी होण्यास मदत होईल. वरील गोष्टींचा प्रामुख्याने विचार करून नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील करारपद्धतीवरील विविध संवर्गातील प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेमध्ये सामावून घेणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे त्वरित पाठविण्यात यावा.

# स्वच्छताकर्मींना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार 'स्वच्छ सर्वेक्षण २०२३' अंतर्गत आयोजित सफाईमित्रांना (फ्रंट वर्कर) आपत्तीविषयक विविध बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शहर स्वच्छतेमध्ये सतत मानांकन उंचावत राहिले असून यावर्षी देशात तृतीय क्रमांकाचे शहर म्हणून नावाजले गेले आहे. या मानांकनात सर्वात महत्वाचे योगदान स्वच्छताकर्मींचे असून 'निश्चय केला नंबर पहिला' हे आपले ध्येय साध्य करण्यासाठी 'स्वच्छ सर्वेक्षण २०२३' ला सामोरे जाताना आणखी जोमाने काम करूया, असे आवाहन ढोले यांनी केले.

आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या उपआयुक्त मंगला माळवे, वैद्यकिय अधिकारी डॉ. कैलास गायकवाड, अग्निशमन अधिकारी पुरुषोत्तम जाधव, अग्निशमन केंद्र अधिकारी अरुण भोईर व व्हि. डी कोळी आणि इतर अधिकारी, कर्मचारी या वेळी उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत आपत्ती धोके प्रतिबंध विषयावर म्हणजेच आग, भूकंप, रासायनिक आपत्तीबाबत ध्वनीचित्रफितीव्दारे जनजागृती, दैनंदिन जीवनात येणाऱ्या विविध आपत्तींवर मात करण्यासाठी मार्गदर्शन, मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यादृष्टीने ऑनलाईन आरटीई प्रवेश प्रणालीबाबतचे मार्गदर्शन, मातृत्व शिशू जननी सुरक्षा योजनेबाबत मार्गदर्शन अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

आजच्या प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी बेलापूर विभागातील १७ व नेरूळ विभागातील १३ अशा ३० गटांना प्रशिक्षण देण्यात आले. अग्निशमन प्रतिबंधक



करावयाच्या उपाययोजना त्याचप्रमाणे वैद्यकिय अधिकारी डॉ. कैलास गायकवाड यांनी जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम तसेच शिक्षण विस्तार अधिकारी सुलभा बारघरे यांनी राईट टू एज्युकेशन या विषयाची माहिती दिली व उपस्थितांशी संवाद साधत त्यांचे शंकानिरसन केले. अधिक्षक रवी जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या वेळी अग्निशमन अधिकारी यांनी अग्निशमन विषयक प्रात्यक्षिकेही करून दाखविली. उर्वरित सहा विभाग कार्यालयांतील गटांचे प्रशिक्षण ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर २०२२ रोजी सकाळ व दुपार अशा दोन सत्रांत विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेले आहे.

# उरणमध्ये जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती रॅली

**उरण : बातमीदार**

जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून इंदिरा गांधी ग्रामीण शासकीय रुग्णालय उरण व एन. आय हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने एच आय व्ही एड्स विषयक उरण शहरात जनजागृती रॅली आयोजित करण्याचा आले होते.



या रॅलीचे उद्घाटन मुख्याध्यापक डी. बी. कोठवदे व ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधिक्षक डॉ. बी. एम. कालेल यांच्या हस्ते करण्यात आले. या रॅली मध्ये उपमुख्याध्यापक जी. बी. पाटील, एस. एस. पाटील, पर्यवेक्षक व्ही. पी. सागळे, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष मनोज ठाकूर, एस. एस. जगताप, व्ही. एल. काठे, सारिका घरत आदी उपस्थित होते.

या रॅलीमध्ये एड्सबद्दल वेगळे घोषणा देण्यात आल्या. वचन पाळा एड्स टाळा. युवकांनी ठरवायचं आहे एड्सला हरवायचे आहे. मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक. एड्स झालेल्या वक्तिंचा स्वीकार करू. भेदभाव टाळा अशा घोषणा देण्यात आल्या. जातिक एड्स दिनाचे महत्त्व व एचआयव्ही एड्स या रोगाविषयी जनजागृती करत महादेव पवार समुपदेशक इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालय यांनी या रोगविषयी असणारे समज गैरसमज एचआयव्ही होण्याचे कारणे सांगितली. एड्स विषयी मुलांशी संवाद साधला.

विवाहपूर्व एड्स चाचणी करणे किती महत्त्वाचे आहे या बद्दल मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. बी.कोठावदे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार सहाय्यक शिक्षक एस. एस. पाटील यांनी मानले.

# केबीपी कॉलेजचा नॅनोराम टेक्नॉलॉजीशी सांमजस्य करार



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजने नुकताच बेंगलोर येथील नॅनोराम टेक्नॉलॉजीशी सांमजस्य करार केला. हा सांमजस्य करार तीन वर्षांचा असून, याचा फायदा महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, संशोधक व उद्योजक होण्याची इच्छा असणाऱ्यांना होणार आहे.

या करारांतर्गत सेंटर फॉर नॅनो इनोव्हेटिव्ह इंजिनीरड टेक्नॉलॉजी स्थापन करण्यात येणार आहे. या सेंटरच्या माध्यमातून नॅनो तंत्रज्ञान कौशल्य तसेच नवनवीन अभ्यासक्रम व उपक्रम राबवले जाणार आहेत. अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी दिली.

नॅनोराम टेक्नॉलॉजी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ए. आर. फणी या वेळी उपस्थित होते. डॉ. ए. आर. फणी यांनी या कराराचा फायदा विविध क्षेत्रातील कंपन्यासाठी, आवश्यक असलेले मनुष्यबळ विकसित करण्यासाठी होणार आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होण्यासाठी हा सांमजन्य करार करण्यात आला आहे. या कराराच्या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक, नॅनोरामचे संचालक डॉ. ए. आर. फणी मायक्रोबायोलॉजीचे प्रमुख डॉ. केशव शिंदे, डॉ. अर्चना चव्हाण, प्रा. प्रसाद माने, कविता जाधव, राहुल पालवे, श्री. कृष्णा आदी उपस्थित होते.

# दिघोडे येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील दिघोडे हनुमान मंदिर येथे २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत भव्य ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

श्रीमत परमहंस जीवनमुक्त स्वामी महाराज, श्रीमत परमहंस परमानंद स्वामी महाराज, श्री समर्थ सद्गुरु गोपाळकाका महाराज, श्री समर्थ सद्गुरु नामदेव बाबा महाराज, श्री समर्थ सद्गुरु एकनाथ महाराज, श्री समर्थ घनश्याम महाराज, श्री समर्थ धावजी महाराज, श्री समर्थ राजाराम महाराज, श्री समर्थ गजानन महाराज, श्री समर्थ सद्गुरु नागाबाबा महाराज, श्री समर्थ सद्गुरु जगनाथ महाराज ह.भ.प.गोपाळ महाराज, श्री समर्थ मधुकर महाराज, श्री समर्थ सद्गुरू गोविंद महाराज यांच्या कृपाशिर्वादाने श्री महंत रामकृष्ण चैतन्य महाराज परत यांच्या नेतृत्वा खाली भव्य ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

२७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रम झाले. दरम्यान, ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता हभप जगदीश महाराज जोशी (त्यंबकेश्वर) यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

# उरणच्या मिलिंद म्हात्रे यांना बेस्ट फिल्म डायरेक्टर अवॉर्ड

**उरण : बातमीदार**

जिद्द, चिकाटी, मेहनत व दृढ आत्मविश्वास असेल तर नक्कीच यश आपल्या पायाशी लोळण घालते. याचा प्रत्यय अविरत चित्रपटला आला आहे. कलाकारांच्या आयुष्यातल्या पहिल्या चित्रपटाने त्यांना मानसन्मान मिळवून दिला दिला. तो चित्रपट म्हणजे अविरत. या चित्रपटाचे निर्माते मिलिंद म्हात्रे यांना आयडियल इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल २०२२ मध्ये सिल्लोड संभाजीनगर येथे झालेल्या या भव्य दिव्य सोहळ्यात बेस्ट फिल्म डायरेक्टर या अवॉर्डने महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री नामदार अब्दुलजी सत्तार यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



या कार्यक्रमाला आयडियल इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलचे सर्वेसर्वा भिकान कांबळे, राजू कांबळे, अनिता साळवे, उमेश निकाळजे, सुभाष शिंदे या कार्यक्रमाचे निवेदक सुभाषजी तायडे पाटील या पुरस्कार समितीचे सर्व ज्युरी मेंबर, सर्व डायरेक्टर व सदस्य आदी उपस्थित होते.

औरंगाबाद येथे झालेल्या सोहळयात या चित्रपटाचे सहनिर्माते राजेश पवार, पवार मॅडम या चित्रपटातील गरीब मुलाच्या भूमिकेतील मुख्य कलाकार शुभम होळकर यांनी हा पुरस्कार स्विकारला.

वाचाल तर वाचाल!
जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

**वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.**

**येत्या रविवारी, ४ डिसेंबर २०२२ रोजी वाचूया येथील डॉ. नितीन आरेकर (कर्जत) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.**

# अधिसंख्या पदावरील कर्मचार्‍यांना मिळणार सर्व सेवाविषयक लाभ

## आमदार रमेश पाटील यांनी मानले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

**मुरुड : प्रतिनिधी**

राज्यातील अनुसूचित जमातीमधील अधिसंख्या पदावर वर्ग केलेल्या शासकीय व निमशासकीय सेवेत असणार्‍या कर्मचार्‍यांना सेवानिवृत्ती वेतन, भविष्यनिर्वाह निधी व इतर अंतिम सेवाविषयक लाभ देण्याचा तसेच त्यांना पुढेही अधिसंख्या पदावर कायम ठेवण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला असल्याचे आमदार रमेश पाटील यांनी पत्रकारांना सांगितले.



(छाया : संजय करडे)

शासकीय व निमशासकीय विभागात गेल्या २५ ते ३० वर्षांपासून अनुसूचित जमातीतील बांधव काम करीत असून, सन १९९५ ते २००३पर्यंतच्या जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचार्‍यांना सन २०१९ मध्ये अधिसंख्य पद निर्माण करून या पदावर समाविष्ट केले आहे, परंतु अधिसंख्या पदावरील कर्मचार्‍यांना सेवाविषयक कोणतेही लाभ मिळत नसल्याने त्यांच्यात असंतोष निर्माण झाला होता. आमदार पाटील यांनी जुलै महिन्यामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या कर्मचार्‍यांना सेवानिवृत्ती होईपर्यंत सेवेत कायम करावे व त्यांना निवृत्तीनंतरचे सर्व सेवाविषयक लाभ देण्यात यावेत, अशी मागणी केली होती. नुकताच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत त्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

अधिसंख्या पदावरील कर्मचार्‍यांना निवृत्तीनंतरचे सर्व सेवाविषयक लाभ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतल्यामुळे अनुसूचित जमातीतील अनेक बांधवांना दिलासा मिळाला आहे. या कर्मचार्‍यांच्या मागण्यांविषयी देवेंद्र फडणवीस नेहमी सकारात्मक होते, असे सांगून आमदार पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सर्व समाज बांधवांच्या व कर्मचार्‍यांच्या वतीने आभार मानले.

# ‘नवीन शिक्षण पद्धतीतील बदल शिक्षकांनी आत्मसात करावेत’






**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. शिक्षण आणि कौशल्य विकास यावर आधारित हे धोरण आहे. देशात कुशल मनुष्यबळ तयार करणे, हा त्या मागचा हेतू आहे. त्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असेल. त्यामुळे शिक्षकांनी नविन शैक्षणिक धोरण समजून घेऊन नवीन बदल आत्मसात केले पाहिजेत, असे मत कौशल्य विकास मार्गदर्शक विनायक जोगळेकर यांनी अलिबाग येथे व्यक्त केले.

चेंढरे-अलिबाग येथील चिंतामणराव केळकर विद्यालयात केंद्र सरकारचे नवीन शैक्षणिक धोरण या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत विनायक जोगळेकर उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. या वेळी व्यवसाय मार्गदर्शक माधुरी लेले, मार्कस पारखे, प्रा. अविनाश ओक, दत्ता खानविलकर एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष अमर वार्डे यांच्यासह शिक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

नविन शैक्षणिक धोरणात प्रचलित शिक्षण पद्धतीत मोठा बदल केला जाणार आहे. शिक्षण आणि कौशल्य विकास एकत्रपणे दिले जाणार आहे. औद्योगिक गरजा लक्षात घेऊन कौशल्य विकास अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास करणे, त्यांच्यात आत्मविश्वास वाढवणे, देशात कुशल मनुष्यबळ तयार करणे हा त्यामागचा हेतू आहे.

शिक्षण हे पुस्तकांपुरते मर्यादित राहणार नसून ते व्यवसायाभिमुख कौशल्य विकासावर अवलंबून असणार आहे. ज्यामुळे शिक्षणाची व्याप्ती पुस्तकाबाहेरही वाढणार आहे. रोजगारक्षम शिक्षण पद्धतीवर आगामी काळात भर दिला जाणार आहे. हा बदल लक्षात घेऊन शिक्षण क्षेत्रात होणारे बदल आत्मसात करायला हवेत, असे विनायक जोगळेकर म्हणाले. या वेळी माधुरी लेले आणि मार्कस पारखे यांनीदेखील शिक्षकांना मार्गदर्शन केले. प्रा. अविनाश ओक यांनी आभार मानले.

# पोलादपुरातील तुर्भे विभागात विविध विकासकामांचे भूमिपूजन



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील तुर्भे भागातील तीन कोटी ५० लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन सोमवारी (दि. २८) बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रतोद आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. स्थानिक जनतेने जे सांगितले ते देण्याचा प्रयत्न आम्ही केला. आम्ही दिलेला शब्द पाळला, असा दावा आमदार गोगावले यांनी या वेळी केला.

पोलादपूर तालुक्यातील तुर्भे बुद्रुक-तुर्भे खोंडा नळ पाणीपुरवठा योजना, तुर्भे बुद्रुक शिवाजी चौक ते तुर्भे खोंडा रस्ता, तुर्भे बुद्रुक-शेलारवाडी रस्ता, तुर्भे बुद्रुक सभामंडप, तुर्भे बुद्रुक बौद्धवाडी संरक्षण भिंत, तुर्भे बुद्रुक गावठाण रस्ता, तुर्भे बुद्रुक येथील मंगेश गोळे यांच्या घराजवळील साकव इत्यादी विकासकामांचे भूमिपूजन सोमवारी आमदार गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.

माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे तालुकाप्रमुख निलेश अहिरे, विभाग प्रमुख लक्ष्मण मोरे, तसेच दशरथ उतेकर, संदेश कदम यांच्यासह सरपंच, उपसरपंच पक्षाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी पंचक्रोशीतील ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# माथेरानच्या प्रवेशद्वारावर उभारला हिरकणी कक्ष

## नगर परिषदेचा अभिनव उपक्रम

**माथेरान : प्रतिनिधी**

दस्तुरी नाका येथील प्रवासी करवसुली कार्यालयातील एका प्रशस्त खोलीत माथेरान नगर परिषदेतर्फे हिरकणी कक्ष उभारण्यात आला असून, यापुढे तेथे स्तनदा मातांना आपल्या बाळांना स्तनपान करणे शक्य होणार आहे. ज्येष्ठांना तेथे विश्रांतीसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

पर्यटकांना योग्यप्रकारे मार्गदर्शन व्हावे, इथले विविध मुख्य पॉइंट्स त्याचप्रमाणे वाहतुकीच्या सुविधेबाबतीत माहिती मिळावी यासाठी नगर परिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे यांनी दस्तुरी नाका येथे माहिती केंद्र उभारले आहे. पर्यटकांना त्याचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.



(छाया : भूषण सातपुते)

# रामधरणेश्वर डोंगरावर वणवा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पावसाळा संपल्यानंतर पुन्हा एकदा वणवे लागायला सुरुवात झाली आहे. सोमवारी (दि. २८) दुपारच्या सुमारास अलिबाग तालुक्यातील रामधरणेश्वर डोंगरावर लागलेल्या आगीत वनसंपदेची मोठी हानी झाली. स्थानिक ग्रामस्थ आणि वन विभागाच्या कर्मचार्‍यांनी आग आटोक्यात आणली.

रामधरणेश्वर डोंगरावर आग लागल्याची माहिती मापगांवचे माजी उपसरपंच चंद्रकांत खोत यांनी मुनवली येथील पर्यावरणप्रेमी व सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांना दिली. घाडी यांनी लागलीच ही माहिती

### वनसंपदेची हानी



वनकर्मचारी प्रभाकर भोईर यांना दिली. भोईर यांनी वेळ न दवडता आपले वनकर्मचारी नागेश काष्टे, मंगेश धोंगडे, सुमित पाटील, प्रसाद मानकुळे यांना सोबत घेऊन घटनास्थळी आग विझविण्यासाठी गेले, तोपर्यंत घाडी यांनी प्रतीक पाटील याला सोबत घेऊन आग विझवण्यास सुरुवात केली होती.

वनकर्मचारी येईपर्यंत आगीने रौद्ररूप धारण करून वनसंपत्तीचे नुकसान तर केलेच शिवाय अर्ध्यापेक्षा जास्त जंगल बेचिराख होऊन हिरव्यागार जंगलात काळीकुट्ट चादर पसरली, याबद्दल पर्यावरणप्रेमींनी हळहळ व्यक्त केली आहे, तसेच समाजकंटकांचा शोध घेऊन कठोर कारवाइची मागणी केली.

> **यापुढील काळात वनक्षेत्रात गस्त वाढवून वनविभागाने वनांचे अर्थातच राष्ट्रीय संपत्तीचे संरक्षण करावे.**
> **-सचिन घाडी, सामाजिक कार्यकर्ते, मुनवली, अलिबाग**

# नेरळच्या श्री गणेश मंदिर सामाजिक सभागृहासाठी २० लाखांचा निधी



**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ पायरमाळ भागातील श्री गणेश मंदिराच्या सामाजिक सभागृहासाठी डोंगरी विभागातून २० लाखांचा निधी देण्याची घोषणा आमदार महेंद्र थोरवे यांनी केली. आमदार थोरवे यांच्या हस्ते या गणेश मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचे भूमिपूजन केल्यानंतर ते बोलत होते.

भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर यांच्या पुढाकाराने पायरमाळ मंदिराचा जीर्णोद्धार केला जात आहे. आमदार थोरवे यांच्या हस्ते कुदळ मारून भूमीपूजन करण्यात आले. या वेळी म्हसकर दाम्पत्यांसह सरपंच उषा पारधी, माजी सरपंच जान्हवी साळुंखे, माजी उपसरपंच अंकुश शेळके, केतन पोतदार, सदस्य श्रद्धा कराळे, गीतांजली देशमुख, शिवाली पोतदार, उमा खडे, संतोष शिंगाडे, राजन लोभी, माजी सदस्य नितेश शाह, कर्जत पं. स. चे माजी सदस्य नरेश मसणे, भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते नितीन कांदळगावकर, शेकापचे तालुका अध्यक्ष श्रीराम राणे, सुमन लोंगले, सुधाकर देसाई, मयूर हजारे, संजय कराळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# वेणगाव येथील शिबिरात २९१ रुग्णांची तपासणी

**कर्जत : प्रतिनिधी**

आयुर्वेद ही भारतीय संस्कृती आहे. आयुर्वेदिक उपचाराने दुर्धर आजार कायमचे बरे होत असत. आयुर्वेदिक उपचार पद्धतीने व आपल्याकडे उपलब्ध असलेल्या वनौषधीने आपल्या शरिराला कोणताही अपाय होत नाही उलट ऊर्जा मिळते, असे प्रतिपादन ज्योविस आयुर्वेद केंद्राच्या डॉ. ज्योती सातपुते यांनी कर्जत तालुक्यातील वेणगाव येथे केले.

वेणगाव येथील श्री महालक्ष्मी देवस्थानच्या वतीने माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, ज्योविस आयुर्वेद केंद्र-दादर आणि नरी सामाजिक संस्था-दादर यांच्या सहकार्याने मंदिराच्या सभागृहात मोफत आयुर्वेद चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात डॉ. ज्योती सातपुते मार्गदर्शन करीत होत्या.

डॉ. राज सातपुते यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. देवस्थानचे अध्यक्ष रंजन दातार, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, सचिव मनीषा सुर्वे, खजिनदार विजय मांडे, सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, दीपक बेहेरे, विशाल जोशी, रमेश मुंढे, विलास वैद्य, सचिन वझे आदी या वेळी उपस्थित होते. विशाल जोशी यांनी प्रास्ताविक केले. राजाभाऊ कोठारी यांनी मनोगत व्यक्त केले.



(छाया : विजय मांडे)

या शिबिरात चामखीळ आणि भोवरी काढणे, खांदेदुखी, गुढगेदुखी, कंबरदुखी, वात, पित्त, अग्निकर्म, रक्त मोक्षण, दूषित रक्त काढणे आदी आयुर्वेदिक उपचार करण्यात आले. एकूण २९१ रुग्णांची आरोग्य तपासणी करून त्यांना सर्व प्रकारची औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. डॉ. राज सातपुते आणि डॉ. ज्योती सातपुते, डॉ. अस्मिता सावंत, डॉ. सोनाली घाणेकर, डॉ. प्राची चावडे, डॉ. सिद्धी लवंगारे, डॉ. हर्षदा राऊत, डॉ. पूजा पाटील, डॉ. विशाखा जाधव यांच्यासह आयेशा वाडकर, तनिश सोलंकी, राज भिंगारदेवे, प्रियांका वाडेकर आदी आरोग्य सेवकांनी रुग्णांची तपासणी केली.

कर्जत तालुक्यासह डोंबिवली, कल्याण, बदलापूर आदी भागातील रुग्णदेखील तपासणी करून घेण्यासाठी या शिबिराला आले होते. लक्ष्मण तथा बंधू पवार, यशवंत गोरे, हृषीकेश दातार, विशाल गोगटे, तुषार जोशी, रंजना प्रभू-खानोलकर, ममता सिंग, ज्योती पाटील, लीना गावडे, सानिका सावंत, विलास लाड, कुमार बोराडे, नितीन दगडे, साक्षी वाडेकर, पद्मजा देशमुख, सुजाता, सावंत, सुप्रिया देशमुख या वेळी उपस्थित होते.

# खोपोलीत लैंगिक शिक्षण मार्गदर्शन



(छाया : विनायक माडये)

**खोपोली : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या मनातील लैंगिक प्रश्नांना व शंकांना व्यक्त होण्यासाठी व माहिती जाणून घेण्यासाठी सहज सेवा फाउंडेशनच्या वतीने बुधवारी (दि. ३०) खोपोली हिंदी विद्यालय आणि वासरंग येथील लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालयात विशेष उपक्रम राबविला. त्यात खोपोलीतील प्रख्यात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुभाष कटकदौंड यांनी विद्यार्थ्यांना आणि पुणे येथील डॉ. विशाखा पवार व डॉ. रेश्मा रणदिवे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

या उपक्रमासाठी हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक एन. एस. सिंग, सहशिक्षक एम. इ. पाटील, बी. आर. पाटील, रेश्मा बांदल, मीनाक्षी प्रचंडे, नीलिमा चनेल, जे. एम. नखादे, एस. एस. देशपांडे तसेच लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गीता पाटील, सहशिक्षक संगीता पाटील, एन. एम. सकपाळ, आर. एस. भोसले, पी. पी. फराट, डि. के. ठाकरे, एस. एस. पाटील, डी. आर. पाटील, एल. वी. पाटील, एम. आर. घोडविंदे, माया कांबळे तसेच डॉ. संगीता केजरीवाल यांचे सहकार्य लाभले. सहजसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशिका शेलार, सचिव वर्षा मोरे, खजिनदार संतोष गायकर, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, महिला संघटक निलम पाटील, कार्यवाह अखिलेश पाटील, सचिन गवळी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# अलिबागमध्ये पोलीस भरतीबाबत प्रशिक्षण शिबिर


**अलिबाग : जिमाका**

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र गरुडझेप मार्फत अलिबाग उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि. २९) येथील जिल्हा नियोजन भवन येथे पोलीस भरतीबाबत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील १४५ तरुण-तरुणी या शिबिरामध्ये सहभागी झाले होते.

कोणतही काम पूर्ण होईपर्यंत अशक्य वाटत असते. मात्र परिश्रम आणि चिकाटी याचा आपल्या दैनंदिन जीवनात वापर करून कोणत्याही परीक्षेला सामोर जाता येते, अशा शब्दांत शिबिरार्थींना मार्गदर्शन करण्यात आले.

रायगड जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, परिविक्षाधीन तहसीलदार अक्षय ढाकणे, नायब तहसीलदार श्रद्धा चौगुले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्मज मोरे, मुंबईतील देवनार पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक रामचंद्र तांबे यांनी प्रशिक्षणार्थींना पोलीस भरतीच्या अनुषंगाने परीक्षेचे अर्ज ऑनलाईन भरणे, पुस्तकांची उपलब्धता, पोलीस भरती परीक्षेचा अभ्यासक्रम व शारिरीक क्षमता चाचणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

# वडविहीर येथे मद्यपी चढला मोबाईल टॉवरवर



**खालापूर : प्रतिनिधी**

चौक-कर्जत मार्गावरील वडविहीर येथील मंगेश सोनवणे हा मद्यपी दारुच्या नशेत गावातील मोबाईल टॉवरवर चढला होता. त्याचे वृत्त समजताच खालापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक सूर्यवंशी यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी दारूच्या नशेत असणार्‍या मंगेशला खाली उतरण्याचे आवाहन केले, मात्र तो जुमानत नव्हता. शेवटी पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने मंगेश सोनवणे याला सहीसलामत खाली उतरविले. टॉवरवरून खाली येताच त्याने पोलिसांची माफी मागितली.

# अर्जेंटिना उपांत्यपूर्व फेरीत

## फुटबॉल वर्ल्डकप स्पर्धेत पोलंडचा पराभव

**दोहा : वृत्तसंस्था**

कतारमध्ये खेळल्या जात असलेल्या फिफा विश्वचषक स्पर्धेमध्ये अर्जेंटिनाने पोलंडचा २-०ने गट क सामन्यात पराभव केला. या विजयासह लिओनेल मेस्सीच्या संघाने उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे.

दोन्ही संघांना पूर्वार्धात एकही गोल करता आला नाही. त्यामुळे तो ०-० असा बरोबरीत राहिला. यानंतर उत्तरार्धात अर्जेंटिनाने चुकांमधून धडा घेत शानदार खेळ दाखवला. ॲलेक्सिस ॲलिस्टरने ४६व्या मिनिटाला संघासाठी पहिला गोल केला. त्यानंतर ६७व्या मिनिटाला ज्युलियन अल्वारेझने गोल



करून अर्जेंटिनाच्या बाजूने स्कोअर २-० केला. येथून पोलंड बॅकफूटवर आला आणि सामना वाचवू शकला.

उपांत्यपूर्व फेरीत अर्जेंटिनाचा सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. पोलंडविरुद्धचा सामना अर्जेंटिनाच्या संघाने जिंकला असेल, पण कर्णधार लिओनेल मेस्सीची कामगिरी खूपच निराशाजनक होती. त्याला पेनल्टीवरही गोल करता आला नाही. यावरून त्याच्या कामगिरीचा अंदाज लावता येतो.

मेस्सीची पेनल्टी किक पोलंडचा गोलरक्षक वोज्शिच सैनीने डावीकडे डायव्हिंग करून वाचवली. ही ३१वी पेनल्टी होती जी मेस्सीला त्याच्या कारकिर्दीत रूपांतरित करता आली नाही. पेनल्टी किक चुकल्यानंतर मेस्सी म्हणाला, पेनल्टी किक चुकल्याने मी खरोखर निराश झालो होतो, कारण मला माहित होते की, एक गोल संपूर्ण सामना बदलू शकतो, तो तुम्हाला वेगळ्या पद्धतीने खेळण्यास भाग पाडतो, पण मला वाटते की पेनल्टी चुकल्याने संघ मजबूत झाला.

दरम्यान, फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत रंगतदार सामने होत असल्याचे दिसून येत आहे.

# क्रीडा पुरस्कारांचे राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनातील अशोका हॉलमध्ये सर्वोच्च क्रीडा पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. सोहळ्यास केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर आणि क्रीडा राज्यमंत्री निशित प्रामाणिक उपस्थित होते.

राष्ट्रपती भवनात झालेल्या या सोहळ्यात टेबल टेनिसमधील भारताचा आघाडीचा खेळाडू अंचता शरथ कमलला मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्वीकारण्यासाठी जेव्हा ४० वर्षीय कमलचे नाव पुकारण्यात आले, तेव्हा उपस्थित प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्या वाजवल्या. कमलने कारकीर्दीत राष्ट्रकूल स्पर्धेत १३ पदके, आशियाई क्रीडा स्पर्धेत दोन कांस्यपदके मिळविली असून पॅरिस ऑलिम्पिकसाठी तो पात्रता सिद्ध करण्याच्या तयारीत आहे. सन्मानचिन्ह, मानपत्र आणि रोख २५ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

स्टीपलचेस धावपटू अविनाश साबळे, बुद्धिबळपटू भक्ती कुलकर्णी, बॅडिमटनपटू लक्ष्य सेन आणि एचएस प्रणॉय यांच्यासह २५ क्रीडापटूंना



अर्जुन क्रीडा पुरस्कार बहाल करण्यात आला. त्यांना अर्जुनाचा कांस्य धातूचा पुतळा, मानपत्र आणि रोख १५ हजार रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सोहळ्यात प्रथम खेलरत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्यानंतर द्रोणाचार्य आणि अखेरीस अर्जुन पुरस्काराचे वितरण करण्यात आले. राष्ट्रीय क्रीडादिनी होणारा हा कार्यक्रम सलग दुसऱ्या वर्षी निवड प्रक्रिया लांबल्यामुळे पुढे ढकलावा लागला होता.

# ‘सीकेटी’च्या विद्यार्थ्यांची वूशु स्पर्धेत दमदार कामगिरी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड अंतर्गत बुधवारी (दि. ३०) झालेल्या पनवेल महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय वूशु स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

या स्पर्धेत आर्यन स्वेन प्रथम, सोहम सावंत प्रथम, रोहित मालविया प्रथम, निश्चय पंत प्रथम व ऐश्वर्या गोरे प्रथम क्रमांक पटकाविला. सर्व विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल तसेच त्यांची मुंबई विभागीय शालेय वूशु स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ऑस्ट्रेलियाची डेन्मार्कवर मात



**दोहा : वृत्तसंस्था**

उत्तरार्धात मध्यरक्षक मॅथ्यू लेकीने केलेल्या गोलच्या बळावर ऑस्ट्रेलियाने विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील ड-गटाच्या अखेरच्या साखळी सामन्यात डेन्मार्कला १-० असा पराभवाचा धक्का दिला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने केवळ दुसऱ्यांदा विश्वचषकाच्या बाद फेरीत प्रवेश मिळवला.

स्पर्धेत आगेकूच करण्यासाठी दोन्ही संघांना विजय महत्त्वाचा होता. त्यामुळे दोन्ही संघांनी बचावावर अधिक भर दिला.

डेन्मार्कला चेंडूवर अधिक वेळ नियंत्रण मिळवण्यात यश आले तसेच त्यांनी गोलच्या दिशेने १३ फटकेही मारले, मात्र त्यांना एकही गोल करता आला नाही. याउलट ऑस्ट्रेलियाचा भक्कम बचाव करतानाच चेंडू मिळताच प्रतिआक्रमण करण्याचा प्रयत्न होता. अखेर त्यांना ६०व्या मिनिटाला गोल करण्यात यश आले. लेकीने अप्रतिम वैयक्तिक गोल करीत ऑस्ट्रेलियाला आघाडी मिळवून दिली. अखेर ही आघाडी निर्णायक ठरली.

ऑस्ट्रेलियाने यापूर्वीच्या सामन्यात ट्युनेशियाचा पराभव केला होता. विश्वचषकात सलग दोन सामने जिंकण्याची ही त्यांची दुसरीच वेळ ठरली. या कामगिरीमुळे त्यांना १६ वर्षांच्या कालावधीनंतर विश्वचषकाची बाद फेरी गाठण्यात यश आले.

# टीम इंडिया बांगलादेश दौऱ्यावर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यूझीलंड दौऱ्यानंतर टीम इंडिया आता बांगलादेशला रवाना होणार आहे. ४ डिसेंबरपासून भारतीय संघ तीन वनडे आणि दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी बांगलादेशला जाणार आहे. या दौऱ्याची सुरुवात ४ डिसेंबरला एकदिवसीय मालिकेने होणार आहे.

विराट कोहली, रोहित शर्मा, केएल राहुल हे सर्व खेळाडू टीम इंडियात या दौऱ्यासाठी परतत आहेत. त्याच वेळी सूर्यकुमार यादव, संजू सॅमसन या खेळाडूंना या दौऱ्यावर विश्रांती देण्यात आली आहे. रोहित शर्मा, विराट कोहली आणि केएल राहुल यांना न्यूझीलंड दौऱ्यावर विश्रांती देण्यात आली होती.

**एकदिवसीय मालिकेचे वेळापत्रक**

पहिला सामना : ४ डिसेंबर दुपारी १२.३० वाजता शेर-ए-बांगला राष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, ढाका

दुसरा सामना : ७ डिसेंबर दुपारी १२.३० वाजता शेर-ए-बांगला राष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, ढाका

तिसरा सामना : १० डिसेंबर दुपारी १२.३० वाजता, जहूर अहमद चौधरी स्टेडियम, चटगाव

**कसोटी मालिकेचे वेळापत्रक**

पहिला कसोटी सामना : १४-१८ डिसेंबर सकाळी ९.३० वाजता, जहूर अहमद चौधरी स्टेडियम, चटगाव

दुसरा कसोटी सामना : २२-२६ डिसेंबर सकाळी ९.३० वाजता, शेर-ए-बांगला राष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, ढाका

**वनडे मालिकेसाठी भारतीय संघ** : रोहित शर्मा (कर्णधार), शिखर धवन, विराट कोहली, रजत पाटीदार, श्रेयस अय्यर, अक्षर पटेल, राहुल त्रिपाठी, वॉशिंग्टन सुंदर, रवींद्र जडेजा, केएल राहुल, ऋषभ पंत, दीपक चहर, इशान किशन, शार्दुल ठाकूर, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, यश दयाल.

**कसोटी मालिकेसाठी भारतीय संघ** : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, केएल राहुल, श्रेयस अय्यर, रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, शार्दुल ठाकूर, ऋषभ पंत, श्रीकर भरत, कुलदीप यादव, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, उमेश यादव.

# विराटची फलंदाजी क्लास दर्जाची

## पाकिस्तानी गोलंदाज हॅरिस रौफकडून कौतुक

**कराची : वृत्तसंस्था**


ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेची चर्चा अजूनही सुरू आहे. विशेष करून स्पर्धेमध्ये पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात विराट कोहलीने केलेली खेळी आजही या ना त्या कारणाने चर्चेत असते.

विराटने भारताला पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध रोमहर्षक विजय मिळून दिला. १९व्या षटकामधील विराटचे हे षटकार टी-२० क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोत्तम फटक्यांपैकी असल्याचे यापूर्वीही अनेकांनी म्हटलेले असतानाच आता खुद्द हॅरिसनेही या षटकांबद्दल भाष्य केले आहे. विराट वगळता इतर कोणाला ते फटके मारता आले नसते असे हॅरिसने म्हटले आहे. हॅरिसने विराटची ही फटकेबाजी म्हणजे क्लास दर्जाची फलंदाजी होती असे नमूद केले.

मी भारताविरुद्ध नियोजित योजनेनुसार गोलंदाजी केली, मात्र विराटने मारलेले ते दोन षटकार म्हणजे त्याच्या फलंदाजीचा दर्जा दाखवून देणारे फटके होते. तेच षटकार दिनेश कार्तिक किंवा हार्दिक पंड्याने मारले असते तर मला वाईट वाटले असते, मात्र ते विराटने मारले यातच त्याच्या फलंदाजीचा दर्जा दिसून येतो. ते फटके अगदी क्लासिक होते, असे रौफने म्हटले आहे.


॥१४ वे पुण्यस्मरण॥

“सर्व काही असूनही, काहीच नसल्यासारखे आहे...
सर्व सुखांनी भरलेले हे कुटुंब, आपल्यावाचून अपुरे आहे...
आपल्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली”



कै. चौथुबाई हरी ठाकूर

आपले विनीत

श्री. रामशेठ ठाकूर, श्री. काना हरि ठाकूर,
श्री. अरुण हरि ठाकूर, सौ. तुळसाबाई गो. घरत आणि ठाकूर परिवार, पनवेल.


# खेळाडूंच्या क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी ऑनलाईन प्रणालीचे उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात राष्ट्रीय-अंतरराष्ट्रीय पदकप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय सेवेत पाच टक्के आरक्षण ठेवण्यात आले असून, खेळाडूंच्या क्रीडा प्रमाणपत्रांची वैधता पडताळणीसाठी क्रीडा विभागाने ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीचे उद्घाटन क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. खेळाडूंनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे

या वेळी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे सचिव रणजीतसिंह देवल, क्रीडा व युवक सेवा आयुक्त डॉ. सुहास दिवसे, क्रीडा विभाग क्रीडा विभागाचे उपसचिव सुनिल हंजे,



कबड्डी, खो-खो, व्हॉलिबॉल व कुस्ती खेळांच्या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महाजन म्हणाले, क्रीडा विभागामार्फत शासकीय व निमशासकीय सेवेत खेळाडूंसाठी पाच टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. या आरक्षणासाठी खेळांडूची क्रीडाविषयक प्रमाणपत्रे पडताळणी करण्याचे काम क्रीडा विभागामार्फत करण्यात येते, हे पडताळणीसाठी खेळाडूंचा अर्ज, त्यांचे क्रीडाविषयक प्रमाणपत्र, संघटनांमार्फत त्या-त्या क्रीडा स्पर्धांची विविध आवश्यक कागदपत्रे प्रत्यक्ष सादर करण्यात येत होती. तथापि, बनावट क्रीडा प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय नोकरी मिळविणे, तसेच संघटना सचिव यांची बनावट स्वाक्षरी व कागदपत्रे सादर करुन शासनाची फसवणूक निदर्शनास आलेली आहे. याद्वारे पात्र खेळाडूंच्या बाबतीत अन्याय झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे क्रीडा विभागामार्फत ऑनलाईन प्रणाली विकसित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

या ऑनलाईन प्रणालीद्वारे खेळाडू त्यांची नोंदणी करून, ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज व इतर कागदपत्रे ऑनलाईन सादर करतील. खेळाडूंचा ऑनलाईन अर्ज क्रीडा विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभागाचे विभागीय उपसंचालक, क्रीडा हे त्यावर ऑनलाईन कार्यवाही करतील, तसेच खेळाडूंना पात्रताविषयक अहवाल प्रदान करतील. ही सर्व कार्यवाही ऑनलाईन असल्याने, खेळाडूंना त्यांच्या अर्जाची सद्यस्थिती कळू शकेल. या प्रणालीद्वारे सर्व कामकाज केल्या जाणार असल्याने, हा सर्व डाटा ऑनलाईन उपलब्ध होणार असून निर्णय प्रक्रियेमध्ये पारदर्शकता व गतिमानता येणार आहे असल्याचे महाजन यांनी सांगितले.

# ट्युनेशियाकडून फ्रान्सला पराभवाचा धक्का

**अल रायन : वृत्तसंस्था**

ट्युनेशियाचे धारदार आक्रमण आणि अखेरच्या सेंकदाला ‘व्हीएआर’ने विरोधात निर्णय दिल्याचा परिणाम फ्रान्सच्या कामगिरीवर झाला आणि विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील त्यांची विजयी मालिका खंडित झाली. ड-गटातील अखेरच्या सामन्यात ट्युनेशियाने फ्रान्सचा १-० असा पराभव केला.

या पराभवानंतरही फ्रान्सने गटातील अग्रस्थान कायम राखले, मात्र त्यांना दुबळ्या संघाकडून पराभव पत्करण्याची नामुष्की सहन करावी लागली. अन्य सामन्यात ऑस्ट्रेलियाने डेन्मार्कवर मात केल्याने ट्युनेशियाचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.


वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...



गुळसुंदे पं. स. विभागीय अध्यक्ष व सावळे ग्रामपंचायत सदस्य



सुनील माळी

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

भाजपा

सौजन्य : प्रशांत माळी, रोशन पाटील


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com